2020

# आम्ही उपक्रमशील शिक्षिका

## ता- पाचोरा जि- जळगाव










जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,जळगाव.

# उपक्रमशील शिक्षिका

## ता. पाचोरा, जि. जळगाव

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव.

# उपक्रमशील शिक्षिका

## ता. पाचोरा जि. जळगाव

प्रकाशक

प्राचार्य

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

प्रेरणा

श्री. दिनकर पाटील

संचालक, म. रा. शै. सं. व प्र. परिषद, पुणे

संकल्पना, निर्मिती व संकलन

प्राचार्य, जि. शि. व प्र. सं. जळगाव

संपादन

डॉ. मंजुषा क्षीरसागर

प्राचार्य तथा संपर्क अधिकारी, तालुका – पाचोरा

अरुण भांगरे

वरिष्ठ अधिव्याख्याता, डायट, जळगाव

प्रतिभा उभाळे

उपशिक्षिका, जि. प. शाळा पिंप्री बु. (डां)

केंद्र – पिंपळगाव हरे.

संपादन सहकार्य

डॉ. मंगेश घोगरे

वरिष्ठ अधिव्याख्याता, डायट, जळगाव

सुचेता पाटील

अधिव्याख्याता, डायट, जळगाव

डॉ. राजेंद्र महाजन

अधिव्याख्याता, डायट, जळगाव

विद्या बोरसे

अधिव्याख्याता, डायट, जळगाव

शैलेश पाटील

अधिव्याख्याता, डायट, जळगाव

प्रदीप पाटील

अधिव्याख्याता, डायट, जळगाव

विकास पाटील

गटशिक्षणाधिकारी, पं. स. पाचोरा

## सहकार्य

**वनिता जिकाटे**

विषय साधन व्यक्ती, गटसाधन केंद्र, पाचोरा

**गिरीष भोयर**

विषय साधन व्यक्ती, गटसाधन केंद्र, पाचोरा

**अरुण पाटील**

उपशिक्षक, जि. प. शाळा पिंपळगाव बु.

## मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट

**अरुण पाटील**

उपशिक्षक, जि. प. शाळा पिंपळगाव बु.

ता. भडगाव

**सुनील बडगुजर**

उपशिक्षक, जि. प. शाळा बोदवड

ता. मुक्ताईनगर

**************************************************************************************************

सभ्यपणा ही शिक्षणाची तर सुसंवाद ही सुसंस्कृतपणाची खुण आहे.

चारित्र्य आणि बुद्धी यांच्या सहाय्याने राष्ट्र उन्नत बनविता येते.

दुसऱ्याच्या हितासाठी आपला जीव गेला तरी परवा नाही,
असा विचार मनात येणे मोठ्या भाग्याचे लक्षण आहे.

सुंदर शरीरापेक्षा सुंदर आचरण अधिक काळ टिकते.

उदार खंबीर मन आणि बलशाली मनगट हेच खरे सामर्थ्य.

## प्रस्तावना

नमस्कार !

शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी नेहमी जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याशी संवाद होतो. अनेक शाळांमध्ये आनंदी, उत्साही वातावरण दिसून येते. कारण शाळेतील प्रत्येक घटकाने त्यासाठी प्रयत्न केलेले असतात. पाचोरा तालुक्यातील शिक्षिकांनी आपल्या वर्गात वा शाळेसाठी वैयक्तिक, सामुहिक प्रयत्न केलेले आहेत. अभ्यासपुरक आणि अभ्यासेतर उपक्रम, कृतींचा त्यात समावेश आहे. हे प्रत्यक्ष अनुभव असून विद्यार्थी वर्तन बदल शिक्षिकांना दिसून आलेला आहे. पुस्तकास अंतिम रूपात आणणाऱ्या प्रत्येकाचे अभिनंदन!

उपक्रमशील शिक्षिका हे पुस्तक सर्व उपक्रमशील शिक्षक बंधू- भगिनींचे नेतृत्व करते आणि मार्गस्थ करते. पुस्तकास भरभरून शुभेच्छा !

डॉ. मंजुषा क्षीरसागर<br>
प्राचार्य<br>
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

***

## मनोगत

कार्यश्रेणी निर्देशांकांमधील अध्ययन निष्पत्ती एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. इयत्तानिहाय, विषयानुरूप, त्या विद्यार्थ्यांना प्राप्त होणे गरजेचे आहे. त्यासाठी कृतीशिल, उपक्रमशिल अध्ययन- अध्यापनाची जोड देणे आवश्यक आहे. यासाठी धडपडणारे शिक्षक सतत नवनवीन प्रयोग करीत असतात. त्यामुळे मुलांना अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यास मदत होते.

पाचोरा तालुक्यातील अशा काही उपक्रमशील शिक्षिकांचे उत्तम प्रयत्नांचे संकलन करून पुस्तक स्वरूपात प्रकाशित करीत आहोत. जेणेकरून त्यांचे कौतुक आणि इतरांना सहकार्य व प्रेरणा मिळावी. पुस्तक कामी सहकार्य करणाऱ्या टीमचे धन्यवाद आणि मनापासून शुभेच्छा !

अरूण भांगरे<br>
वरिष्ठ अधिव्याख्याता, डायट, जळगाव.

***

# अंतरंग


माझी शाळा, संस्कारशील शाळा - प्राजक्ता जळतकर /6

मी केलेली देशसेवा - अरुणा उदावंत /10

एक पाऊल स्वच्छतेकडे - गायत्री पाटील /12

शरीर सुदृढ तर मन सुदृढ - पुष्पलता पाटील /16

हसत खेळत वाचन दिव्यांगाचे समावेशन - सोनाली सैंदाणे /20

माझी कुटुंब डायरी - दीपा बोडखे /23

चिप्पी चिप्पी खेळू, संख्या चला वाचू - प्रतिभा उभाळे /25

आम्ही समजपूर्वक ऐकतो - प्रतिभा उभाळे /27

कल्पक होऊया - दीपा बोडखे /29

जादुई पिटारा - वैशाली पाटील /30

Rolling The Balls - ज्योती महाजन /33

वाचन माझे, लेखन तुमचे - शितल महाजन /35

खेळ खेळूया बेरीज-वजाबाकी शिकूया - विजया पाटील /37

'वांग्याचं देठ, मला येऊन भेट'- वनिता जिकाटे /39

अक्षरलेखन - स्वाती महाजन / 41

वाढवूया आपली शब्दसंपत्ती - वृषाली सोनार /43

माझी किंमत ओळखा - स्वाती पाटील /46

शब्दकोडी सोडवूया शब्द तयार करुया - जयश्री मुसळे /47

वाचाल तर वाचाल - मोहिनी पाटील /49

लोकरी पासून राखी बनवणे - गायत्री जैन /51

Learn to speak English - रूपाली चौधरी /53

वाचन कौशल्य विकसित करणे - विजया पाटील /55



# उपक्रम क्र. १

## माझी शाळा, संस्कारशील शाळा

**इयत्ता :** 3 री

**उपक्रमासाठी विषय :** मूल्यशिक्षण

तीन दिवसीय निवासी संस्कार शिबीर

### प्रस्तावना :

पाचोरा तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा, म्हसास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबरच मूल्यांवर आधारीत संस्कार देण्याचे कार्यही यशस्वीपणे पार पाडत आहे. शांतीलाल मुथ्था फाऊंडेशन व राज्यशासन शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मूल्यवर्धनाचे प्रशिक्षण तालुका स्तरावर देण्यात आले. तसेच निष्ठा प्रशिक्षण ही सर्व शिक्षकांना देण्यात आले. या प्रशिक्षणांतून प्रेरणा घेऊन आमच्या शाळेतील मुख्याध्यापकांनी जळगांव जिल्हयातील पहिलाच आगळा वेगळा उपक्रम तीन दिवसीय निवासी संस्कार शिबीर घेण्याचे ठरवले. यात सर्व सहकारी शिक्षकांनी तन मनाने सहभाग घेऊन उपक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

### उपक्रमाची गरज :

समाज माध्यमांचा वाढता प्रादुर्भाव,बदलत चाललेली सामाजिक परिस्थिती यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर होत असतो. म्हणून एक सुसंस्कृत भारतीय नागरीकघडविण्यासाठी, योग्य ते संस्कार देण्यासाठी, राष्ट्रभक्ती, देशभक्ती या विषयी आत्मीयता निर्माण करण्यासाठी, सामाजिक मूल्यांची ओळख करून त्या मूल्यांचा अवलंब करण्यासाठी आमच्या शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला.

### उपक्रमाची उदिदष्टे :

1) पुस्तकी ज्ञानाचा संबंध दैनंदिन जीवनाशी प्रस्थापित करणे. 2) विद्यार्थ्यांमधील वाईट वर्तणुकीचे उच्चाटन करून चांगल्या सवयी लावणे. 3) स्वयंशिस्त व स्वावलंबन या गुणांची जोपासना करणे. 4) कुटुंबाचे महत्व, कुटुंबातील व्यक्तीच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य यांची जाणीव निर्माण होणे. कुटुंबाविषयी जिव्हाळा निर्माण करणे. 5) संघभावना, स्वच्छता, नीटनेटकेपणा, वक्तशीरपण, संवेदनशीलता, समयसूचकता, समाधीटपणा इ. गुणांचा विकास करणे. 6) नृत्य, नाटय, गायन, संवाद कौशल्य याद्वारे कलागुणांचा विकास करणे.

### उपक्रमाच्या कृतीचे पूर्वनियोजन :

1) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निरीक्षणासाठी नोंद तक्ता व हजेरीपत्रक तयार केले. 2) पालकांचे संमतीपत्रक व दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंची यादी तयार करून विद्यार्थ्यांना वाटप केले. 3) तीन दिवसांचे दैनंदिन वेळापत्रक व कार्यक्रमांचे नियोजन केले. 4) तीन दिवस आमंत्रित करावयाचे प्रमुख पाहुणे व वक्ते यांची निवड केली व निमंत्रण दिले.

5) सर्व विद्यार्थ्यांची दहा कुलांमध्ये विभागणी केली. कुलांना राजा व राणीची नावे दिली.

6) निवास व्यवस्थेसाठी तंबूंची उभारणी केली. भोजन व्यवस्था पूर्व नियोजन केले.


**साहित्य :** 1) विद्यार्थी दैनंदिन हजेरीपत्रक व नोंद तक्ते. 2) दैनंदिन जीवनावश्यक साहित्य. 3) साऊंड सिस्टीम, स्टेज,निवासासाठी तंबू,गादया,लाईट व्यवस्था.

**कालावधी :**

दि.27-01-2020 ते दि. 29-01-2020

**उपक्रमाची कार्यवाही :**

तासिका संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी कपडे बदलणे, हातपाय स्वच्छ धुणे, गटकार्य करणे, साफसफाई या सारख्या कृतीचे निरीक्षण करण्यात आले. 7) प्रत्येक कुलामधील विद्यार्थ्यांची शिस्त, निटनेटकेपणा, सहकार्यवृत्ती स्वागताची पध्दत या आधारे कुलांना गुणदान करून प्रत्येक दिवशी आदर्श कुलाची निवड करून बक्षिस देण्यात आले. 8) संध्याकाळी शिबीराचे उदघाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या प्रसंगी गुच्छ कवायत, भाषणे, गायन यांचे सादरीकरण केलेल्या वेळी मोठया प्रमाणात पालक वर्ग उपस्थित होता. 9) त्या नंतर सर्व विद्यार्थ्यांचे




**पहिला दिवस :** दि. 27-01-2020

1) सर्व विद्यार्थ्यांकडून पालकांचे संमतीपत्रक घेतले. 2) विद्यार्थ्यांची त्यांच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या सामानासह तंबूमध्ये निवास व्यवस्था केली. 3) विद्यार्थ्यांना शिबीराचे नियम दैनंदिन वेळापत्रक, गुणदान योजना, कार्यक्रम या विषयी सूचना देण्यात आल्या. 4) कुलप्रमुखांची निवड केली. कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित केल्या. 5) दैनंदिन अध्यापनाचे कार्य प्रत्येक शिक्षकाने कुलांमध्ये जाऊन केले. 6) शालेय अध्यापन

भोजन व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली.

**दुसरा दिवस :** 28-01-2020

1) विद्यार्थ्यांची उठण्याची वेळ, दात घासणे, शौचास जाणे, अंघोळ करणे, स्वत:चे कपडे स्वत: धुणे, स्वत:ची भांडी स्वत: धुणे, परीसर स्वच्छता, कुल स्वच्छता या सर्व गोष्टींचे निरीक्षण करण्यात आले. 2) प्रातर्विधी, व्यायाम, चहा, नाश्ता, खेळ, मुक्त अभिव्यक्ती यानंतर दैनंदिन अध्यापन करण्यात आले. 3) दिवसभरात गावातील नागरिक, परिसरातील शिक्षक, पालक यांनी भेटी दिल्या.



यावेळी विद्यार्थ्यांनी स्वत:च्या कुलाची माहिती, दैनंदिन कार्य या विषयी मुक्तपणे अभिव्यक्त होऊन माहिती दिली. 4) संध्याकाळी विद्यार्थी व पालक यांच्या संवादाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे पालकांविषयी असलेले मत, पालकांच्या आपल्या पाल्या कडून असलेल्या अपेक्षा, भविष्यातील योजना या विषयी अतिशय भावनिक असा संवाद झाला. 5) त्यानंतर केंद्रातील तसेच तालुक्यातील अनुभवी तज्ञ मार्गदर्शक व शिक्षक यांच्या द्वारे उदबोधनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. यावेळी शिवरायांच्या कार्याविषयी व्याख्यान, सामाजिक जागतीपर किर्तन, व्यायाम व प्राणायामाचे महत्व, अहिराणी भाषेची महती व गोडवा, अहिराणी गीते, गणित विषयक मार्गदर्शन करण्यात आले.



## तिसरा दिवस : 29-01-2020

1) पहाटे उठण्यापासून संध्याकाळ पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व कृतींचे निरीक्षण करून गुणदान करण्यात आले. योग्य अयोग्य कृतींविषयी मार्गदर्शन करण्यात आले. 2) संध्याकाळी उत्कृष्ट गायक शिक्षकांच्या गायनाचा व संस्कार विषयक मार्गदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. 3) मान्यवरांनी कुलांचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचे उदबोधन केले. 4) विद्यार्थ्यांनी यावेळी गीतगायन, नृत्य याद्वारे उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी शिबीराविषयी आपले मनोगत व्यक्त केले तो प्रसंग अतीशय भावनिक होता. 5) दुसऱ्या दिवशी प्रातर्विधी व व्यायामानंतर विद्यार्थ्यांना घरी सोडण्यात आले.

## फलनिष्पत्ती :

1) विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निरीक्षणाद्वारे विद्यार्थी शाळेव्यतिरिक्त वेळेत कसे वर्तन करतो ते समजले. त्यामुळे त्यांच्यातील दोषांचे उच्चाटन करण्यास मदत झाली. 2) शिबीरात सर्व कामे स्वत:करावी लागल्याने स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली. 3) घरापासून दूर राहिल्यामुळे कुटुंबाचे महत्व,आई वडिलांचे महत्व, आपली कौटुंबिक कर्तव्ये यांविषयी जाणीव झाली. 4) कुलात एकत्र राहिल्याने संघभावना वाढीस लागली. स्वयंशिस्त, सहकार्य, स्वच्छता, निटनेटकेपणा, वक्तशीरपणा, समयसूचकता हे गुण वाढीस लागले. 5) विद्यार्थी एकत्र राहिल्याने उच्चनीच जाती भेदभाव, गरीब, श्रीमंत असा भेद न राहता एकोपा निर्माण झाला. 6) विद्यार्थ्यांमधील नृत्य, नाटय, गायन, भाषण, संवाद या कलांना वाव मिळाला. सभाधीटपणा वाढीस लागला. 7) विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये औपचारिक नाते न राहता विद्यार्थ्यांशी अधिक जवळीक निर्माण झाली. शिबीर उद्घाटन जि. शि. व प्र. सं. जळगाव प्राचार्य यांच्या हस्ते तर समारोप गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते झाले. अशा प्रकारे अतिशय संस्मरणीय,जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारा असा उपक्रम आमच्या शाळेने पार पाडला.

प्राजक्ता तुषार जळतकर
जि. प. प्राथमिक शाळा, म्हसास
ता.पाचोरा जि.जळगांव

***

समाजाचा विकास केवळ सत्तेने होत नाही
तो आदर्श शिक्षकांमुळे होतो.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.
ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही.

विचार न करता शिकणे हे निरुपयोगी असते
तर न शिकता विचार करणे हे धोकादायक असते.



# उपक्रम क्र. 2
## मी केलेली देशसेवा

**उद्दिष्टे :** १) देशसेवा म्हणजे काय ही संकल्पना स्पष्ट होते. २) आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यात दक्ष होतात. ३) आपले ध्येय यासोबतच नैतिक मूल्य व देशाच्या साधनसामग्रीचा विचार केला जातो. ४) उत्तम व सवेदांशिल नागरिक होण्यास मदत होते.

**पूर्वनियोजन :**

१) मानसिक व वैचारिक तयारीसाठी चर्चासत्र घेणे. २) तीन टप्पे चर्चासत्राचे ठरविणे. ३) प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी साहित्य व योजनेबाबत विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना देणे .

**कार्यवाही :**



या उपक्रमासाठी पूर्व नियोजनात तीन सत्र घेऊन देशसेवा म्हणजे केवळ लढायला सीमेवर सैनिक म्हणून जाणे नसून आपण आहोत त्या ठिकाणी देखील छोट्या छोट्या गोष्टीतून आपण साधनसंपत्तीचे जतन आणि विद्युत बचत, सरकारी मालमत्ता सुरक्षा, वडिलधाऱ्यांची मदत यासारख्या अनेक गोष्टी करून देशसेवा करू शकतो हा विचार पुढे आला. व नंतर मी दररोज सकाळी झोपेतून उठल्यापासून झोपेपर्यंत काय देशसेवा केली हे एका वहीत दिनांक निहाय लेखन करायला सांगितले. त्याचे वर्गात पहिल्या तासाला वाचन करायला सांगितले. वाचन करतांना मी केलेली कृती देशसेवेला कशी कामी येणार याचे स्पष्टीकरण मुलांनी केले. त्यावर वर्गात चर्चा घडवून आणली. आपण कोणकोणत्या कृती केल्यानंतर ते आपल्या स्वतःच्या जीवनात सोबतच आपल्या कुटुंबाच्या फायद्याच्या आहेत यावर चर्चा करून गटागटाने ती कामे करू लागली. त्यात वृक्षतोड थांबवून कचऱ्याची होळी करणे, व्यसनमुक्तीसाठी गटाने घरोघर प्रबोधन करणे, मतदान प्रक्रियेत भाग घेण्यासाठी लोक प्रबोधन करणे व मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सांगणे, सार्वजनिक यात्रा, जत्रा, देवस्थान इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविणे. आदी उपक्रम

देशसेवा म्हणून ते करू लागले. तर गरज नसताना विजेचे दिवे बंद करणे, पाणी वाया जाऊ नये म्हणून नळ बंद करणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, कागद न फाडणे, शाळा व घर परिसरात कचरा न करणे, एकमेकास वस्तू शेअर करणे इत्यादी सारख्या गोष्टी करू लागले. तसेच



मी म्हणजे राष्ट्राची संपत्ती आहे व मी शिकणे, निर्व्यसनी राहणे म्हणजे उत्तम नागरिक बनणे हे सर्वात मोठी देशसेवा आहे. असे ते स्वतः बोलू लागले.

## फलनिष्पत्ती :

१) देश सेवेची संकल्पना स्पष्ट झाली. २) छोट्या-छोट्या कृती उपक्रम म्हणून करताना केलेल्या कृती दैनिक जीवनाच्या सवयीचा भाग झाल्या. ३) संस्कारक्षम विद्यार्थी तयार झाला. ४) माझी कोणती कृती देशाच्या हिताची आहे यावर विचार चिंतन होऊ लागले. ५) नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन होऊ लागले. बचत होऊ लागली. ६) मी स्वतः देशाची संपत्ती आहे ही भावना वाढली. त्याचप्रमाणे विद्यार्थी अभ्यासातही मेहनत करू लागले. ७) गुणवत्तेत वाढ झाली. कर्तव्याबरोबर जबाबदारीचे भान आले.

८) दुर्बल घटकांना स्वतःमध्ये सामावून घेण्याचा विचार वाढीस लागला. विद्यार्थी मुलींचे शिक्षण, व्यसनमुक्ती, बेरोजगारी, व्यवसायाभिमुख शिक्षण यासारख्या गोष्टींवर चर्चा करू लागलीत व छोटेखानी कामे देखील करू लागले.

**अरुणा मुकुंदराव उदावंत**
**जि. प. मराठी शाळा राजुरी बुद्रुक**
**ता. पाचोरा जि. जळगाव**

***

शिक्षण हे एक प्रभावी अस्त्र आहे, जे वापरून तुम्ही प्रत्यक्ष जग बदलताना बघू शकता.



# उपक्रम क्र. 3

# एक पाऊल स्वच्छतेकडे

**वर्ग :** पहिली/दुसरी

**विषय :** शारीरिक शिक्षण

**अध्ययन निष्पत्ती :**

शालेय गणवेशाचे निगा राखणे. नियमित गणवेशात शाळेत येणे. स्वच्छतेच्या सवयी अंगी बांधणी.

**उपक्रमाचा प्रकार :** दीर्घकालीन उपक्रम

**उपक्रमाची गरज :**

जिल्हांतर्गत ऑनलाइन बदलीने नव्या शाळेवर दिनांक 17 /6/ 2019 रोजी हजर झाले. द्विशिक्षकी शाळा पूर्वीचे दोन्ही शिक्षक बदलून आम्ही नव्याने तिथे हजर झालो. मुलांच्या सवयींचे निरीक्षण केल्यावर लक्षात आले की चांगल्या सवयीचा मागमूसही त्यांच्याकडे नव्हता. भकास चेहरे, निस्तेज डोळे मळलेले कपडे, विस्कटलेले केस आणि अंगाचा बुरसटवास. हे होते माझ्या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे चित्र. पालक भेटी घेतल्यानंतर कळाले कि आई-वडील सकाळीच कामावर निघून जातात. न्हाणीघराचा अभाव सततचे दुर्लक्ष आणि अवहेलना, प्रेमापासून वंचित, नेहमीच तिरस्कार, स्वजाणिवेचा विकास न झालेला, शाळा म्हणजे शिक्षा ही भावना, गरिबी, सोयी-सुविधांचा अभाव व आरोग्याबाबत अज्ञान, भरकटलेले जीवन, व्यसनी आई वडील, मोठे कुटुंब आणि प्राथमिक गरज यांचा अभाव, जीवन कौशल्य यांचे ज्ञान नाही, सामाजिक हीन वागणूक, असमानता, अज्ञान, अविकसितपणा इत्यादी वरील सर्व समस्यांचे चालते-बोलते चित्र होते माझे विद्यार्थी. यांच्यासाठी आपण काहीतरी करायला हवे. मी छोट्या-छोट्या आणि उपयुक्त कृती करायला घेतल्या. बदल अपेक्षित होता आणि तो एका दिवसात घडून येणारा नव्हताच.

**उद्दिष्टे :** १) स्वच्छतेच्या सवयी अंगी रुजविणे. २) नियमित स्वच्छ धुतलेल्या गणवेशात शाळेत वेळेवर उपस्थित राहणे. ३) केस नखे वेळच्यावेळी कापणे. ४) चप्पल नियमित वापरणे. ५) स्वची जाणीव विकसित करणे. ६) जेवणाच्या चांगल्या योग्य सवयी लावणे. ७) प्रेम आपुलकी जिव्हाळा या भावना विकसित करण्याची संधी देणे. ८) स्वतःची कामे स्वतः करण्याची संधी निर्माण करून ती सवय नियमित लावणे. ९) शाळेविषयीची अनामिक भीती घालवून खेळातून शिक्षणाची संधी निर्माण करुन देणे. १०) काटकसर बचत आणि अनावश्यक खर्च यांची विद्यार्थ्यांना जाणिव करुन देणे. ११) जीवन जगण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून संघर्षासाठी प्रेरणा देणे. १२) मुलांमध्ये स्वयंशिस्त जाणीव जागृती आणि जबाबदारीचे भान निर्माण करणे.

**पूर्वनियोजन :** पालक भेटी

पालकांशी संवाद साधून शाळा–पालक–शिक्षक यांच्यातील दरी कमी करून त्यांच्या समस्या समजून

घेऊन त्यांच्या मनात विश्वास निर्माण करून सहकार्य करण्यासाठी प्रेरित केले.

तज्ञ व संबंधित व्यक्तींशी चर्चा : तज्ञ व संबंधित व्यक्तींशी चर्चा शाळेचे मुख्याध्यापक श्री पाटील सर तसेच गावातील शिक्षणप्रेमी तसेच जाणकार आणि सहकाऱ्याशी व्यक्ती यांच्याशी चर्चा करून संबंधित पूर्वस्थिती आणि त्याबाबत करावयाचा उपक्रम यासंदर्भात माहिती देऊन त्यांच्या मतांचा आदर करीत सगळ्यांच्या सहकार्याने उपक्रमाची रुपरेषा ठरवली.

उपक्रम पूर्वनियोजन : प्रथम शिक्षक स्वतः आपले वर्तन, आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवतील. नंतर स्वच्छता, टापटीप गणवेशधारक, विद्यार्थ्यांचे काही मॉडेल्स, चित्र व व्हिडिओ मुलांना दाखवून त्यांच्या मनात शिस्तीबद्दलचे सकारात्मक चित्र मुलांमध्ये तयार करतील.

आवश्यक साहित्य : १) आरसा, पावडर २) साबण (आंघोळीचा- कपड्यांचा) ३) नेलकटर ४) सुईदोरा, बटन, हूक ५) hand wash, रुमाल ६) रिबन, लाल/बेल्ट ७) चप्पल स्टॅन्ड ८) टूथ ब्रश पेस्ट ९) नोंदवही १०) प्रोत्साहनपर बक्षिसे

कालावधी : सदर उपक्रम हा १/८/ 2019 ते २७/२/2020 या कालावधीत राबविला गेला. सदर उपक्रम हा वर्तन बदल व सवयवर आधारित असल्याने निरीक्षण, मूल्यमापन, पुन्हा नवीन कृतीबद्दल निरीक्षण, मूल्यांकन यासाठी वेळ देणे गरजेचे आहे.

उपक्रमाची कार्यवाही :

प्रेमाने जग जिंकता येते या युक्तीचा वापर करत मी आधी मुलांना माझ्याबद्दल विश्वास निर्माण केला. ते कसेही असले, कसेही राहात असले, अस्वच्छ असले तरी ते मला हवे आहेत. मी त्यांना कोणतीही शाब्दिक किंवा शारीरिक शिक्षा देणार नाही असे ठरविले. उलट मी त्यांचा जसा आहे तसा स्वीकार केला. आपण अस्वच्छ असलो तरीही मॅडमना आपण आवडतो. ही जाणीव झाल्यावर त्यांच्यात छान दिसण्याची, राहण्याची जणू स्पर्धाच लागली. मग हळुच वर्गात मोठ्ठा आरसा आणला, कंगवा, पावडरही ठेवले. मग एके दिवशी मुलींच्या लांब केसांसाठी रिबीन व छोट्या केसांसाठी लाल बेल्ट पुरवले. मुली खुश होऊन चापून-चोपून केस विंचरून येऊ लागल्या. मी दर सोमवारी परिपाठ संपल्यानंतर गोलाकार बसवून नेलकटरने नखे कापून देऊ लागली. जेवणाच्या आधी हात धुण्यासाठी हँडवॉश, रुमाल, जेवताना ओळीने रांगेत बसणे, अन्न उष्टं न टाकणे, श्लोक म्हणणे यासाठी मोठ्या मुलांवर जबाबदारी सोपवली. ते व्यवस्थित जबाबदारी पार पाडत आहे की नाही याचे निरीक्षण करीत राहिले. चप्पल रांगेत काढणे, वर्गात ओळीने बसणे, दुसऱ्याच्या वस्तू न घेणे यासाठी वर्गमंत्री नेमला. त्याला त्याची जबाबदारी व्यवस्थित समजून सांगितली. स्वच्छ अंघोळ करून गणवेश घालून आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला परिपाठाच्या वेळेस कौतुक करून बक्षीस देऊन त्यास प्रोत्साहित केले. बटण तुटलेले फाटलेले गणवेशांना मी मधल्या सुट्टीत नीट करून देत असल्याने तोही प्रश्न सुटला. प्रत्येक वर्गासाठी मुलांनी वर्ग नियम तयार केले व तो मोडल्यास आवश्यक ते उपाय योजनाही त्यांनीच सुचवल्या. प्रेमाने आपुलकीने मुलांविषयी सद्भावना ठेवून त्यांना आपलेसे करून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. वर्तन बदल घडत असलेल्या विद्यार्थ्यांची







उदाहरणे इतरांना देऊन त्या विद्यार्थ्यास अधिक प्रोत्साहित करण्यासाठी छोटी छोटी बक्षीसे दिली. वाढलेल्या केसांना योग्य आकार देण्यासाठी स्वखर्चाने शाळेत न्हावी बोलावून घेऊन मुलांचे केस कापून घेतले. काही विद्यार्थ्यांकडे घरी वापरावयास कपडे नसतात म्हणून माझ्या मुलीचे जास्तीचे कपडे त्यांना दिले जेणेकरून गणवेश लवकर खराब होऊ नये. अंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास २ साबण वाटले. लहान मुलांचे कपडे मोठ्या कडून धूऊन घेण्याची जबाबदारी निश्चित करून दिली. विद्यार्थ्यांनी केलेल्या छोट्या छोट्या कृतींचे कौतुक करत त्यांच्या चुकांचा स्वीकार करून त्यांना सतत दिलासा देत राहीले. वर्गखोली परिसर स्वच्छता यातही मुलांचा सहभाग घेऊन त्यांना माझी शाळा सुंदर शाळा यावर परिचय करून दिला. परिसर स्वच्छता, वर्गखोल्यांची सफाई, बागेची काळजी, नखे, केस यांचे निरीक्षण जेवणाच्या वेळी केले. त्यासाठी जबाबदार मुलांचे मंत्री मंडळ नेमून दिले. पहिली दुसरीच्या मुलांचे नाक नेहमी वाहते म्हणून त्यांना छोटे छोटे हातरुमाल पुरवले व त्यांचा वापरही शिकवला. शि सु च्या योग्य सवयी, साबण लावून हात धुणे यांची मुलांना सवय लागेपर्यंत त्यांचे निरीक्षण करत राहिले. नियमित आरोग्य तपासणी व लसीकरण यावर भर दिला मोफत औषधोपचार प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा पाठपुरावा केला. दिवसातून दोनवेळा ब्रश करावा व जेवण झाल्यानंतर चूळ भरावी ही सांगितले .पण नुसतं सांगून जमणार नव्हते म्हणून प्रत्येकाला छोटा ब्रश व छोटा पेस्टही पुरवला.

## फलनिष्पत्ती :

१) मुलांची शाळेविषयीची भीती जाऊन त्यांच्यात शाळेविषयी ओढ निर्माण झाली.

२) नियमितपणे स्वच्छ तसेच आंघोळ करून मुले शाळेत येऊ लागली. आणि हे आधी मॅडमला पण सांगू लागली. याविषयी त्यांच्यात चढाओढ निर्माण झाली. ३) आपण छान दिसतो असे मॅडम यांनी आपल्याला सांगावे यासाठी टापटीप मुले शाळेत येऊ लागली. ४) एक पालक महिला माझ्या समोर येण्यास लाजली याचे कारण विचारल्यावर ती म्हणाली की बाई आम्ही फक्त जन्म दिलाय पण तुम्ही

स्वतःच्या मुलाप्रमाणे आमच्या मुलांना वाढवत आहे म्हणून स्वतःचीच लाज वाटली. पालकात जाणीव-जागृती निर्माण झालेली झोपड्यांवरची मुलं स्वच्छ व्यवस्थित शाळेत येऊ लागले. गावातील इतर मुलेही त्यांना सामावून घेऊ लागले. त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला. ५) लाजरे बुजरेपणा गेला आपण कुणीतरी खास आहोत ही जाणीव बक्षिसे, कौतुक, यातूनच मुलांना मिळत गेल्याने त्यांना स्वतःबद्दलची जाणीव विकसित झाली. ६)पालक, शाळा यांच्यातील सहसंबंध घनिष्ठ होऊन पालकांचे सहकार्य व विश्वास संपादन करण्यास मदत झाली. ७) सतत आजारी असणाऱ्या मुलांचे आजार पण खूपच कमी झाले. ८) आहार आरोग्य तसेच खाण्या संबंधित चांगल्या सवयी मुलांमध्ये दिसून आल्या. ९) दारू पितो किंवा तंबाखू खातो म्हणून आम्ही त्यांना ते करू नये असे सांगितले. त्यानंतर तसे करू नये हे स्पष्टपणे सांगण्या इतपत मुलांमध्ये आत्मविश्वास आला. १०) चॉकलेट खाल्ल्यावर दात खराब होतात ना मॅडम असे धिटाईने विचारतांना मुले बारकाईने विचार करत आहेत हेही कळाले.

**गायत्री सुभाष पाटील**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा**
**वडगाव हडसन ता. पाचोरा**
**जि. जळगाव**

***

माणसे जन्माला येतात, पण माणुसकी मात्र निर्माण करावी लागते.

माणसाने आपल्या आयुष्यात सुख-दुःख मान-अपमान, स्फूर्ती-निंदा, लाभ हानी, प्रिय-अप्रिय ह्या गोष्टी समान समजाव्यात.

स्वातंत्र्य म्हणजे संयम..... स्वैराचार नव्हे.

आयुष्यातला खरा आंनद भावनेच्या ओलाव्यात असतो.



# उपक्रम क्र. ४

# शरीर सुदृढ तर मन सुदृढ.

**उपक्रमासाठी वर्ग :** पाचवी ते सातवी

**उपक्रमाशी संबंधित अध्ययन निष्पत्ती :**

1) विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक, भावनिक विकास होणे. 2) विद्यार्थी लिंग समभावाने वागतात. 3) विद्यार्थी ताणतणावाचे समायोजन करतात. 4) पुरुष व स्त्रिया असा भेदभाव न करता  कामाची समान वाटणी करतात. 5) चांगले आरोग्य राखण्याकरता चांगल्या आरोग्यपूर्ण स्वच्छतेच्या सवयी अंगी बाणवतात.

**विषय :** शारीरिक शिक्षण व परिसर अभ्यास.

**उपक्रमाचा कालावधी :** 01/08/2019 ते 27/02/2020

**उपक्रमासाठी लागणारे साहित्य :** 1) पेन, स्केचपेन, कागद 2) चटई, दोरीउड्यांची दोरी 3) फुगे, बेल 4) बाहुली

**उपक्रमा आधीचे पूर्वनियोजन :**

ऑनलाइन बदलीने या शाळेत हजर झाले. तसे येथे सर्व शिक्षक नवीन आलेले होते. शाळेत विद्यार्थी गैरहजेरी प्रमाण खूप होते. विद्यार्थी परिसरातच फिरताना व खेळतांना दिसत. पण शाळेत येत नव्हते. शाळेला क्रीडांगण नव्हते. शाळेला क्रीडांगण मिळाले तर मुले शाळेत रमतील. या विचाराने प्रयत्नांना सुरुवात केली. शाळेच्या मागे खूप मोठी जागा होती. पण तिथे आजूबाजूचे लोक कचरा टाकत. व्यवस्थापन समिती व नगरसेवक यांच्या मदतीने येथे कचरा टाकू नये अशी लोकांना विनंती केली. वारंवार पाठपुरावा केला. श्रमदानातून तेथे सुंदर क्रीडांगण तयार झाले.

**उपक्रमाची गरज :**

पर्यावरणाचे प्रदूषण वाढले आहे. निसर्गाचा ऱ्हास होत आहे. अनेक आजारांनी डोके वर काढले आहे. याला तोंड देण्यासाठी शारीरिक दृष्ट्या सुदृढ नागरिक तयार होणे गरजेचे आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रचंड प्रमाणात स्पर्धा वाढली आहे. या सर्वांमुळे मानसिक ताणतणाव वाढले आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे शारीरिक कष्ट कमी झाले आहेत. म्हणून जाणीवपूर्वक विविध उपायोजना करून आपले शरीर व मन सुदृढ ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी आरोग्यदायी सवयी लावणे गरजेचे आहे.

**उपक्रमाची उद्दिष्टे :**

1) गैरहजेरीचे प्रमाण कमी करून शंभर टक्के उपस्थिती टिकविणे. 2) निरोगी, आरोग्यपूर्ण स्वच्छतेच्या सवयी व खाण्याच्या योग्य सवयी निर्माण करणे. व्यायामाची आवड निर्माण करणे व खिलाडूवृत्ती निर्माण करणे. 3) जीवनाचा आनंद घेत उत्साहाने आपले नित्य काम करता येणे. 4) ताण तणाव दूर करून एकाग्रता व शांतता मिळवणे. 5) लिंग समभाव रुजविणे. 6) घरातील कामांना सर्वांनी मदत केली पाहिजे हा दृष्टीकोन निर्माण करणे.

श्रमप्रतिष्ठा मूल्य रुजविणे.



## उपक्रमाची कार्यवाही :

सर्वप्रथम माझ्या शाळेच्या मुख्याध्यापकांना व सहकारी शिक्षकांना उपक्रमाविषयी कल्पना दिली. सर्वांनी मिळून सहकार्य करण्याचे ठरले. यासाठी शारीरिक शिक्षणाच्या तासिकांचा उपयोग करून घेण्याचे ठरले.

पौष्टिक आहाराचे महत्व मुलांना समजावून सांगितले. त्यानुसार आपण ताजा व सकस आहार नियमित घ्यावा म्हणून मासिक दिनदर्शिका तयार करून वर्गात लावली. नोंदवहीत मुलांचा मिळणारा प्रतिसाद नोंदवून घेतला. त्यानुसार त्यांना स्टार दिले गेले. महिनाअखेर एका विद्यार्थ्याची 'सुदृढ बालक' म्हणून निवड करून त्याला प्रोत्साहनपर बक्षीस दिले.

योगाभ्यास नियमीत दर शनिवारी घेण्याचे निश्चित केले. त्यासाठी सर्व साधारण मार्गदर्शक तत्वे मुलांना वहीत लिहून दिली. वारंवार तशा सूचना देऊन त्यांच्याकडून योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्कार करून घेतले. जिम्नॅस्टिक मधील सोपे प्रकार – चक्राकार उडीचा सराव घेतला. दोरी उड्या, लांब उडी, उंच उडी, चेंडू फेक, गोळा फेक यांचा सराव घेतला. मैदानी खेळांच्या स्पर्धेचे आयोजन केले. व्यायाम / खेळ घेताना मुलगा व मुलगी असा भेद न करता दोघांनाही सारखेच प्रोत्साहन दिले. चारही शरीर प्रकारांशी समभावाने वागावे ही शिकवण दिली.

कृती – 1

'जीवन आमचे, नियम आमचे'

'तुमच्या जेवणाचे ताट' असा विषय मुलांपुढे ठेवला व चर्चा करण्यास सुरुवात केली. ताटातील विविध पदार्थांवर चर्चा केली. हे अन्नपदार्थ आपल्या ताटात येईपर्यंत कोणी कोणती कामे केली यावर चर्चा केली. मुलांनी घरातील कामांची यादी सांगितली. आईवर पडणाऱ्या कामांची जबाबदारी जास्त आहे हे मुलांना जाणवुन देऊन चर्चा केली. या कामांची समानतेने वाटणी कशी करता येईल यावर चर्चा केली. स्त्रिया बाहेर काम करून पैसे मिळतात व घरातील कामेही करतात. त्याचप्रमाणे पुरुष देखील बाहेरील काम करून घरातली कामे ही करू शकतात. म्हणून घरातील सर्व कामांना सर्वांनी मदत केली पाहिजे हा दृष्टिकोन निर्माण झाला.

कृती –2

'आम्ही छोटेसे बहिण भाऊ'

सर्व विद्यार्थी गोलाकार बसतील. मुले टाळ्या वाजवतील व गाणे म्हणतील – आम्ही छोटेसे बहिण भाऊ, उद्याला मोठाले होऊ, उद्याच्या जगाला उद्याच्या युगाला नवीन आकार देऊ. आम्ही छोटेसे बहिण भाऊ. त्याच वेळी बाहुली एका मुलाकडून दुसऱ्याकडे पास होईल. हे होत असताना शिक्षक मध्येच बेल वाजवतील. त्यावेळी ज्याच्याजवळ बाहुली असेल तो मुलगा उभा राहील.



त्यावेळी त्याने किंवा तिने 'मी हे करू शकेन' असे म्हणून कोणतेही एक काम सांगावे एकाने सांगितलेले काम दुसऱ्याने न सांगता दुसरे काम सांगावे. पुन्हा विद्यार्थी टाळ्या वाजवत गाणे म्हणतील व त्याच वेळी बाहुली एकाकडून दुसऱ्याकडे गोलाकार फिरत राहील. या खेळातून जवळ जवळ सर्वच विद्यार्थ्यांना संधी मिळेल.

मी हे करू शकेल

1) मी संगणकावर काम करेल. 2) मी लहान भावंडांना सांभळेन. 3) मी आईला भाजी चिरून देईन 4) मी बाजारातून वस्तू आणिन. 5) मी बँकेचे कामे करीन. 6) माझ्यावर हमला झाल्यास मी प्रतिकार करेन इ.

या खेळात काही मुली - मुले 'मी हे काम करेन'. कामे सांगताना लाजतात. परंतु स्त्री-पुरुषांची कामे वेगवेगळी नसून एकच आहेत. न संकोचता आपण ती केली पाहिजेत यातून चालत आलेला चुकीचा पारंपारिक वारसा, कामा विषयीचा न्यूनगंड कमी करता आला.

कृती - 3

फुगे घ्या फुगे :

मुले वर्तुळाकार बसतील. मी चिठ्ठ्या टाकून काही फुगे फुगवून ठेवले होते. यानंतर मध्यभागी मुले जोडीजोडीने उभे राहतील. दहा जोड्यांना दहा फुगे दिले. फुगे उडविताना एकमेकांचा हात सोडायचा नाही व फुगा पडू ही द्यायचा नाही.

हळू हळू एक एक जोडी कमी होत जाते. शेवटी एक जोडी विजयी होते. मी विजयी जोडीचे बक्षीस देऊन अभिनंदन केले. आता सुंदर असे वातावरण निर्माण झाले, पुन्हा मुले गोलाकार बसली. आता एक एक विद्यार्थी पुढे येऊन मध्यभागीचा फुगा उचलेल. फुग्यातील चिठ्ठी काढून विद्यार्थी प्रश्न वाचेल. व त्याचे उत्तर सांगेल.

प्रश्न खालील प्रमाणे असतील.

1) जेव्हा तुम्ही रागवलेले असता? काय कराल?

2) जेव्हा तुम्हाला खूप आनंद झालेला असतो?

3) तुमच्या वर्ग मित्राने तुमची खोटी तक्रार तुमच्या वर्ग शिक्षकाकडे केली?

4) तुला अपराधी केव्हा वाटते?

5) कोणती कृती केल्यावर तुला अभिमान वाटतो?

अशा प्रकारे एक एक प्रश्न विचारले गेले. मुलांकडून खूप वेगवेगळी उत्तरे मिळाली. यामुळे किशोरवयीन मुलांमध्ये जे भावनिक बदल होतात त्याचे व्यवस्थापन मला करता आले. खेळाच्या माध्यमातून मुले बोलकी होतात. आत्मविश्वास निर्माण होतो. मुले शिक्षकांच्या अधिक जवळ येतात व आपल्या मनातील अडी-अडचणींची देवाण घेवाण करतात.

फलनिष्पत्ती :

1) बाहेरचे फास्ट फूड, बंद पाकिटातले न खाता

आरोग्यदायी खाण्याच्या सवयी लागल्या. 2) किशोर वयातील शारीरिक बदलांना सामोरे जाण्यास मुले सक्षम बनली. 3) मुले घरात व घराबाहेरही समानतेने कामे करु लागली लिंग समभाव निर्माण झाला.

4) मुलांमध्ये सहनशक्ती, धाडस, आदरभाव, विश्वासूपणा कर्तव्यनिष्ठा या गुणांचा विकास झाला.

5) विद्यार्थी नियमित शाळेत येऊ लागली.

'आरोग्यसंपन्न शरीरात आरोग्य संपन्न मन वास करते' याचा सुंदर प्रत्यय उपक्रमातून आला.


**पुष्पलता आनंदराव पाटील,**
**जि. प.शाळा कृष्णरावनगर**
**ता. पाचोरा, जि. जळगाव.**


***

प्रत्येक बाबतीत दुसऱ्याचे अनुकरण करु नका...
स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा.

स्वावलंबी शिक्षण हेच खऱ्या विद्यार्थ्याचे ब्रीद.

शिक्षक जीवनाचे दार उघडत असतो,
तर विद्यार्थ्यालाच त्यातुन प्रवेश करायचा असतो.

शब्दांसारख शस्त्र नाही,
त्यांचा वापर जपुनच करावा.



# उपक्रम क्र. ५

## हसत खेळत अंक वाचन, दिव्यांगाचे समावेशन...

उपक्रमासाठीचा वर्गः- 1ली ते 3री....

उपक्रमाशी संबधित अध्ययन निष्पत्तीः

( दिव्यांग विद्यार्थ्यांची स्पर्श, व दृश्यअध्ययन शैली विकसित होते).

१) दिव्यांग विद्यार्थी ही सर्वसामान्य मुलांप्रमाणे शिकू शकतात. २) सर्वसामान्य मूल ही दिव्यांग विद्यार्थ्यास सामावून घेतात.

विषयः- 1ते 5 अंक ओळख, गिरवणे

उपक्रमाचा कालावधीः- 4 ते 6 महिने दिव्यांग मुल शिकेल तसं त्याच्या ग्रहणक्षमतेनूसार

उपक्रमासाठी लागणारे साहित्यः-

१) दिव्यांग विद्यार्थ्यांचे मित्र २) शिक्षकांच्या चेहऱ्यावरील हावभाव ३) स्पष्ट व योग्य, हळूवार शब्दोच्चार ४) परिसरातील उपलब्ध झाडांची पाने

उपक्रमाचे पूर्वनियोजनः-

दिव्यांग विद्यार्थ्यांची अध्ययन शैली कोणती आहे आणि त्याची संपादणूक पातळी कशी आहे हे जर समजून घेतले तर दिव्यांगाना शिक्षण देता येते. काही दिव्यांग वर्गात बसत नाही. पाटी पुस्तक त्यांना आवडत नाही हेच जाणून घेऊन त्यांच्या सामाजिक व भावनिक कौशल्यांचा विकास करणे व सर्वसामान्य मुलांसोबतच वर्गाबाहेरच हसत खेळत शिकवायच मी ठरवलं.

उपक्रमाची गरजः-

समावेशनातून दिव्यांग मुले शाळेत प्रवेश घेऊ लागली आहेत. आता ही मुलं समावेशनातून शिक्षणाकडे आणि शिक्षणातून शाळेत टिकून राहावे यासाठी वर्गशिक्षक, विशेष शिक्षक, मुख्याध्यापक, सवंगडी, पालक या सर्व प्रणालीद्वारे शिक्षण घेतील व समाज प्रवाहात येऊन एक सूजाण नागरीक घडतील.

समावेशित शिक्षणातंर्गत व्यवस्थापनाच्या काहीच शाळांमध्ये दिव्यांग बालकेही प्रवेश घेतात. त्यांचे दिव्यांगत्व ओळखून त्यांना शिक्षण मिळणेसाठी त्यांच्या वर्गीकरणानुसार जसे नियमित शाळेत येणारे दिव्यांग विद्यार्थी, अंशतः गरज असणारे, गृहशिक्षणास पात्र, व पूर्णतः अध्यापन सहाय्य दिव्यांग विद्यार्थी असे गट पडतात परंतु वर्गशिक्षक, पालक व मुख्याध्यापकास प्रश्न पडतो कि, हे मूल कसं शिकेल? तेव्हा साहजिकच या उपक्रमाची गरज भासते. त्यांना वेगळं शिकवण्याची किंवा शिक्षण देण्याची गरज नाही आणि म्हणूनच IED उपक्रमातील विशेष शिक्षक हे वर्गशिक्षकास दिव्यांग प्रकार, त्यांची गरज, दैंनदिन निरीक्षण व मूल्यमापन, यांचे वर्गीकरण, दिव्यांग अध्ययन शैली ओळखून त्यांना शैक्षणिक प्रवाहात व सामाजिक प्रवाहात टिकवून ठेवण्यास याची निश्चितच मदत होते.

## उपक्रमाची ऊद्दिष्ट्ये –

१) समावेशित शिक्षण उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे.

२) दिव्यांग विद्यार्थी शाळेत टिकवून ठेवून शिक्षणाची समान संधी ऊपलब्ध करून देणे.

३) दिव्यांग विद्यार्थ्यांची एकाग्रता टिकवून ठेवून स्पर्श, दृश्य, आणि क्रियात्मक अध्ययन शैली विकसित करणे.

४) अंक समजून घेऊन कृती करून अंक शिकणे.



## उपक्रमाची कार्यवाही:–

माझा सागर नावाचा विद्यार्थी तीव्र कर्णदोष असा आहे. मी व वनिता मॅडम यांनी त्याला वयानुरूप इ. 3 री त प्रवेश मिळवून दिला आहे. सागर हा श्रवण सोडून इतर 3 अध्ययन शैलीतून शिकू शकतो. त्याचा हिअरींग लाॅस जरी जास्त असला तरी निसर्ग म्हणतो कोणीही ठार बहिरा नसतो. त्याच्याजवळ काही ना काही उर्वरीत श्रवणशक्तीही असतेच. सागर वर्गात बसत नाही. सामाजिक व भावनिक कौशल्यांचा विचार करून तर मला दर भेटीवेळी क्लूप्त्या वापराव्या लागतात. वर्गात गेल्यावर नेहमीप्रमाणे सर्व मुला–मुलींना सागरशी शेकहँड करायला लावले. दफ्तर वर्गातच राहू द्या, चला आपण बाहेर जाऊया, असं सांगून सागरसह वर्गातील सर्व मुलांना शालेय परिसरातील ऊपलब्ध असलेल्या विविध झाडांची पाने तोडून आणावयास सांगितली. मुलांनी जास्वंद, अशोक अशा झाडांची पाने तोडून आणली. सागरनेही त्याचा हात पोहचेल तशी ४/५ पाने तोडून आणली. बाहेर शाळेच्या ओट्यावर मुलांना गोलाकार व सागरला त्याच्या आवडत्या मित्राशेजारी व माझ्या समोर बसवलं जेणेकरून त्याला मी व सर्व संवगडी हे काय बोलताय याचे सहज ओष्ठ्य वाचन व



चेहऱ्यावरील हावभाव दिसतील. सगळ्यांनी पानं आणली ना रे...अरे वा ! सागर तू ही छान प्रयत्न केलाय (छान ची खूण करत) सागरची पानं माझ्याकडे घेते आणि सगळ्या संवगडीना टाळ्या वाजवायला सांगते. आपण या पानांपासून काय शिकणार आहोत.तुम्हांला माहिती आहे का? मूले एकमेकांकडे बघायला लागली. मी ना गंमत करणार आहे. तुम्ही ओळखा हं...मी त्यातील लहान पाने घेऊन त्याचा गोल तयार केला. मुलांनी लगेच ओळखल्याबरोबर, मी हाताने (खूणेने) गोल तयार झाला हे सागर ला सांगीतले. नंतर त्याच गोलाला बाजूने काही पाने ऊभ्या दिशेने जोडली व मुलांना

विचारले आता काय तयार झाले. मुलं पटकन म्हणाली १ ...वा छान !..बघ सागर हा १ आहे...सागरचा मित्र त्याला एक तयार झाला अस हाताचं बोट काढून सांगतो आणि एक मुलगी बाहेरच्याच फळ्यावर एक अक्षरात लिहीते. तेच सर्वजण वाचतात. सागरही वाचतो. सागरचा बोट धरून मी त्या पानांवरून हळूवार फिरवते असं कृती करून त्याला विचारते. हे काय आहे? तो बोटं जसं फिरवलं तशी कृती करून दाखवतो. शाब्बास ! कसं केलं तुझ्या मित्रांना सांग. सगळे त्याच्याकडे बघतात व मुलांना टाळ्या वाजवायला लावते. मुलं टाळ्या वाजवताय हे पाहून सागरला आंनद होतो.

यावप्रमाणे २ अंक तयार करू हं..मुलं ही जोडू लागतात. पानांचा २ अंक तयार होतो व मूले २ बोलतात. मीही २ बोटे काढून सागरला सांगते कि हा २ व म्हणून घेते. फळ्यावर दोन शब्द लिहीला. सागरचा बोटधरून त्या २ अंकावरून फिरवला. (२ ते ३ वेळा) व आता सागर तयार करेल हं २. करशील ना सागर. त्याच्याजवळ पाने देते व तू कर असं सांगून मुलांना मदत करायला लावते. २ अंक तयार होतो व सर्व संवगडी टाळ्या वाजवून सागरचं कौतुक करतात.

अशापद्धतीने कृती करून घेऊन क्रियात्मक, बोट फिरवून स्पर्श, स्वतः पाने जोडतोय या दृश्य अध्ययनशैली समवेत सोबतचे संवगडी अभिनंदन, चेहऱ्यावरचे हावभाव, हळू व स्पष्ट शब्दोच्चार यांतून सागरला ओष्ठवाचनाची दिलेली संधी दिली असे करत करत ३, ४, ५ अंक पानांनी तयार केले. सर्वसामान्य मुलांनी त्यांच्या कल्पकतेतून विविध क्रिया त्या पानांतून साकारल्या.

**फलनिष्पत्तीः-**

१) वर्गशिक्षकांना पुढील मार्गदर्शन करून अभ्यासात सातत्य ठेवून किमान मूल्यमापन करणे सूलभ झाले. २) वर्गशिक्षकांनी पाहिले तेव्हा त्यांनाही आश्चर्य वाटले. ३) दिव्यांग मुल आणि त्याचं शिक्षण याचा स्विकार होऊन मुलं शिकू लागली आहेत. ४) श्रवणशक्तीनुसार श्राव्य शैलीही उपयोगात आणता येते. ५) दिव्यांगही शैलीनुसार अध्ययन करू शकतात. ६) अध्ययन सोप होऊन दिव्यांग मुलं सक्रीय सहभाग घेतात.

"तुम चलो तो हिंदूस्ताँ चले" असा हा शासनाच्या समावेशन या अभिनव उपक्रमाद्वारे दिव्यांग मूल हे त्याच्या किमान कौशल्याचा विकास करून अध्यापन सहाय्यातून समाज प्रवाहात वावरण्याइतपत सुजाण नागरीक घडविण्यास प्रयास सुरू आहे.

**सोनाली वनजी सैंदाणे**
**(सुलभक/विशेष शिक्षक)**
**गटसाधन केंद्र ,पाचोरा**
**ता. पाचोरा जि. जळगांव**

***



# उपक्रम क्र. ६
# माझी कुटूंब डायरी

**इयत्ता :** तिसरी

**विषय :** परिसर अभ्यास

पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्रमांक 03.95.02 कुटुंबातील व्यक्तींसोबत आणि व्यक्तींमधील नातेसंबंध ओळखतात.

**उपक्रमाचे कृतीपूर्व नियोजन :**

विद्यार्थ्यांना नातेसंबंध चटकन ओळखता यावे यासाठी खालील उपक्रमाचे नियोजन इ.3 री च्या वर्गात केले. त्यासाठी विद्यार्थ्यांना कुटुंबातील सदस्यांचे (आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू, भाऊ-बहीण इ.) चे पासपोर्ट फोटो व कुटुंबातील सदस्यांचे पूर्ण नाव, शिक्षण, व्यवसाय इत्यादी माहिती गोळा करण्यास सांगितली.

**उपक्रमासाठी लागणारे साहित्य :**

रुलिंग पेपर, फेविकॉल, पासपोर्ट फोटो, कार्डशीट पेपर, स्केचपेन इ.

**उपक्रमाचा कालावधी :** दोन आठवड्यातील दोन शनिवार


**उपक्रमाची कृती आणि कार्यवाही :**

पहिला शनिवार –

विद्यार्थ्यांना रुलिंग पेपरवर सर्वप्रथम स्वतःचा फोटो चिकटवून त्यासमोर स्वतःचे नाव, शाळेचे नाव, इयत्ता, हजेरी क्रमांक इ.लिहिण्यास सांगितले. त्यानंतर कुटुंबातील इतर सदस्यांचे फोटो विशिष्ट अंतरावर एकाखाली एक चिकटवून त्यासमोर विद्यार्थ्याशी असलेले नाते, पूर्ण नाव, शिक्षण व व्यवसाय इ.माहिती लिहिण्यास सांगितली.

दुसरा शनिवार –

१) फोटो चिकटवलेल्या रुलिंग पेपरला कार्डशीट पेपरचे कव्हर लावून त्यावर “माझी कुटूंब डायरी” असे शीर्षक देवून विद्यार्थ्याचे पूर्ण नाव व विषय लिहिण्यास सांगून घराचे सुबक चित्र काढून ते रंगविण्यास सांगितले. २) प्रत्येक विद्यार्थ्याच्या डायरीचे वर्गात प्रकट वाचन घेतले.



## उपक्रमाची फलनिष्पत्ती :

१) विद्यार्थ्यांना नाते संबंध ही संकल्पना दृढ झाली.

२) स्वयंलेखनाचा व स्वनिर्मितीचा आनंद मिळाला.

३) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला.

४) लहान व मोठ्या कुटुंबात तुलना करता आली.

अशाप्रकारे या उपक्रमातून मला एक शिक्षक म्हणून मुलांच्या भावविश्वाचा त्याच्या कुटुंबाच्या आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण्यास मदत झाली. उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांची सुंदर अशी “माझी कुटूंब डायरी” तयार झाली.





**दीपा सुभाष बोडखे**

**जि. प. प्राथ. विद्यामंदिर तारखेडे बु.**

**ता.पाचोरा जि.जळगाव**


***

---

शरीराला श्रमाकडे, बुध्दीला मनाकडे
आणि ह्रदयाला भावनेकडे वळविणे म्हणजे शिक्षण.

खरं आणि खोटं यात केवळ चार बोटांचं अंतर आहे.
आपण कानांनी ऐकतो ते खोटं आणि डोळ्यांनी पाहतो ते खरं.



# उपक्रम क्र. ७

## चिप्पी चिप्पी खेळू, संख्या चला वाचू

इयत्ता : दुसरी

विषय : गणित

अध्ययन निष्पत्ती क्रमांक 02.71.01 दोन अंकी संख्यांचे वाचन करतात. 99 पर्यंतच्या संख्या ओळखतात. संख्येतील स्थानिक किंमत ओळखतात. दोन अंकांचा वापर करून लहान मोठ्या संख्या तयार करतात.

उपक्रमासाठी लागणारे साहित्य :

नाणी, नोटा, संख्याकार्ड, दगडांच्या, कौलांच्या किंवा लाकडाच्या चिप्या किंवा खिपऱ्या.

उपक्रमाच्या आधी पूर्वज्ञान :

विद्यार्थ्यांना एक ते नऊ पर्यंतचे संख्या ओळखता येतात. दगड, पाने, काड्या याच्या साह्याने अंक व अंकाइतक्या वस्तू मोजता येतात. मणी माळेवर १०, २०, ३०..........१०० पर्यंत वाचन करता येतात.

उपक्रमाचा कालावधी :

दोन आठवड्यातील गणिताच्या तासिका

उपक्रमाची कृती :

पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी मणी माळेचा उपयोग करून घेतला. उपक्रम खेळ रूपात असल्याने या विषयी उत्सुकता ताणून धरली. प्रथम कृती पटांगणावर एक मीटर × एक मीटर चौरस आखला. आडवे उभे असे तीन समान भाग केलेले एकूण ९ चौरस तयार झाले. त्या चौरसात एक ते नऊ अंक लिहिले. चौरसापासून दोन ते तीन मिटर अंतरावर रेषा आखली.



विद्यार्थ्यांना खेळायला आवडते. मधल्या सुट्टीत चौकोनी डबे आखून बाटलीच्या बुचाचे, दगडाचे फरशीच्या तुकड्यांचे चिप्पी /डावखे बनवून खेळतात. तेव्हा त्यांनाच उपक्रमाच्या चिप्या बनवण्यास सांगितल्या. त्यांना खेळण्यासाठी मार्गदर्शन केले. प्रथम अंक लिहिलेल्या चिप्या होत्या; त्यात मोठ्या चिप्पीवर दहा अंक लिहिलेले तर लहान वर एक अंक लिहिलेला होता. विद्यार्थ्याला मोठी चिप्पी चौरसात फेकायला सांगितली व ज्या अंकावर पडली तितके दहाच्या पटीत मोजायला सांगितले. दुसरी चिप्पी फेकली तितके अंक त्या पटीच्या पुढे मोजायचे म्हणजे दोन अंकी संख्या सांगायचे. चौरसाच्या बाहेर पडल्यास किंवा चौरसाच्या अधेमध्ये पडल्यास शून्य समजायचे. अशाप्रकारे खेळाची माहिती व नियम समजावून सांगितले. सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करण्यासाठी पाच – पाच चे गट पाडले. त्यांना वेगवेगळे खेळायला दिले. उदाहरणार्थ १० चे चिप्पी ५ च्या चौरसात पडली तर त्या विद्यार्थ्याला दहा, वीस, तीस ... पन्नास असे मोजायला सांगायचे. समजले नाही तर अगोदर सराव घेतल्याप्रमाणे नोटांच्या साह्याने समजवायचे. आता लहान चिप्पी फेकायला सांगायचे. समजा तीनच्या घरात पडली तर त्याच्या पुढे एक एक असे तीन वेळा मोजायचे म्हणजे ५३ संख्या मिळते. प्रत्येक गटात मिळवलेल्या संख्या लिहून ठेवायला सांगायची. गटात सर्वात मोठी संख्या मिळेल तो गट विजयी ठरेल. त्या गटाला स्टार द्यायचा. संख्या चिप्पीचा सराव झाला की चिप्पीवरील संख्या ऐवजी दशक एकक असे अक्षरी लिहायचे म्हणजे स्थानिक किमतीचा सराव करून घेता आला. आणखी पुढे बदल करून




पाठ्यपुस्तकातील प्रतिके चिप्पी वर लिहायचे किंवा आकार बदलायचा. त्रिकोण आकार दशक आणि गोल आकार एककसाठी वापरायचा. अशा पद्धतीने उपक्रम क्रीडांगणावर राबवला. तर वर्गात राबवताना कागदी पुठ्याच्या चीप्प्या करून खेळ घेतला.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये :** हा खेळ तयार करायला कमी वेळ लागतो. काही खर्च येत नाही. जागेप्रमाणे वर्गात पटांगणावर खेळता येतो. खेळातून संकल्पना दृढ होते.

**उपक्रमातून माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांना झालेला उपयोग :** मुले एकमेकांना संख्या मोजण्यास मदत करू लागली. विद्यार्थी विद्यार्थी आंतरक्रिया घडून आली. कमी वेळात अधिक सराव झाला. खेळातून स्थानिक किंमत, विस्तार मांडणी, दशक-एकक या संकल्पना समजल्या. खेळ सर्व विद्यार्थ्यांनी खेळला. माझ्या वर्गातल्या दुसरीच्या बावीस विद्यार्थ्यांपैकी अठरा विद्यार्थी पटकन संख्या सांगतात. तर दोन विद्यार्थी नोटा मोजून संख्या बनवतात.त्यांना अधिक वेळ देऊन सराव दिला. दोन मुले चिप्पी घरात टाकण्याच्या कृतीचा सराव घेत आहेत. लवकरच तेही संख्या मिळवतील मात्र इतर मुलांच्या संख्या सांगण्याचा ते प्रयत्न करतात. ***



# उपक्रम क्र. ८

## आम्ही समजपूर्वक ऐकतो.

इयत्ता : चौथी

उपक्रमाचे संबंधित अध्ययन निष्पत्ती :

4.71.3 समजपूर्वक वाचन करतो. पाठावर आधारित प्रश्नांची उत्तरे अर्थपूर्ण लिहितो. इतरांकडून सांगितली जाणारी गोष्ट लक्षपूर्वक ऐकतात व त्यावर आपले मत व्यक्त करतात. प्रश्न विचारतात.

उपक्रमा संबंधी पूर्वज्ञान :

विद्यार्थ्याला पाठावर आधारित प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहिता येतात. तसेच काही शब्दकोडे सोडवता येतात. जसे एवढासा गडू त्याला पाहून रडू. म्हणजे कांदा, चित्र क्रमाने जोडून गोष्ट पूर्ण करता येते.

उपक्रमाचा कालावधी : आठवड्याच्या दोन तासिका. अशा तीन आठवड्यातील एकूण सहा तासिका.

उपक्रमाचे साहित्य : कागदी शेफ टोपी, स्टॉप वॉच, लेखन साहित्य, रिकामी भांडी (भातुकलीची)

उपक्रमाची कृती :

मुली सुट्टीच्या दिवशी भातुकलीचा खेळ खेळतात म्हणजे त्यांच्याजवळ असलेले जेवणाचे डबे बाटलीचे बूच आणि छोटी मातीची भांडी अशा पद्धतीने खेळ खेळण्यासाठी वस्तू जमा करतात. कागदाच्या पानांच्या गोल कापून पोळ्या तयार करतात. आणि दगडांची, काड्यांची भाजी करतात. हे मी पाहिले होते. याचा उपयोग मी शाळेच्या उपक्रमात करून घेतला. उपक्रमाच्या दिवशीही काही मुलांना भातुकलीची भांडी शाळेमध्ये आणायला सांगितली आणि कागदापासुन बनवलेली स्वयंपाकी म्हणजेच शेफची टोपीही बनवून घेतली. भातुकलीची भांडी टेबलावर मांडली. मी शेफची टोपी घातली



आणि मुलांना सांगितले कि माझ्याकडे लक्षपूर्वक पहा आणि मी जी कृती करते ती मला तुम्ही सांगा. मग मी चहा बनवण्याची कृती केली. मुलांनी ती पटकन ओळखली त्यांनाही अशी कृती करण्यास सांगितले. मुलांना ते करता आले. यानंतर कोणाला पोहे करता येतात? असे विचारले. दोन मुलींनी हात



वर केला. त्यांनाही ती कृती करून दाखवण्यास सांगितले. आता मुलांचा उत्साह वाढला. प्रत्येकाला मलाही काही करता येते हे सांगावेसे वाटले. मुले बोलु लागली. दुसऱ्या तासीकेला थोडे वेगळे नियोजन केले. यात मुलांना आधी लागणारे साहित्य आणि नंतर कशी कृती केली ते सांगायचे होते. निरिक्षण करणाऱ्या मुलांना यावर काही प्रश्न विचारले आणि चांगली कृती करणाऱ्या मुलांना शाबासकी दिली. चवदार, स्वादिष्ट, खमंग असे लिहीलेले बॅचेस बनवून घेतले. सादरीकरणावरून मुलांना यापैकी एक बॅच देण्यात आला. मुलांना उत्साह आला. पुढच्या तारखेला आपणही सादर करायचे आणि असा बॅच मिळवायचा असा विचार ते करू लागले. आता मुले घरी आईला वेगवेगळ्या पदार्थांच्या रेसिपी विचारु लागली. वहीमध्ये नोंदवून त्याचा स्वतः सराव करू लागले. पुढच्या वेळेस माझी रेसिपी खमंग असेल असे प्रत्येकालाच वाटू लागले. उपक्रम शाळा स्तरावर परिपाठाचा वेळेस घेण्यात आला. इतर वर्गातल्या मुलांना या उपक्रमात भाग घ्यावे असे वाटले. त्यांनीही घरून तशी तयारी करून आणली. त्यांनी परिपाठाच्या वेळेस असेच सादरीकरण केले. शाळा स्तरावर बालआनंद मेळाव्यात आम्ही थोडासा बदल केला आणि विद्यार्थ्यांना त्यांनी आणलेल्या अन्नपदार्थांची कृती कशी केली? ती चवदार आणि चटकदार कशी आहे? हे येणाऱ्या ग्राहकांना पटवून द्यायचे होते. प्रत्येक जण आपल्या पदार्थाविषयी खुपच माहिती देऊ लागला. त्यात इयत्ता पाचवीचा अर्जुन याने तर पाणीपुरी साठी लागणारी चटणी आणि चाट मसाल्याचे पाणी करताना काय काय कृती केली त्यानंतर प्लेटवर कशा पद्धतीने मांडणी केली याविषयी इतके उत्कृष्ट सांगितले की पाच रुपये प्लेट याप्रमाणे एकाच दिवसात 90 प्लेट म्हणजे साडेचारशे रुपये त्याने कमावले. त्याच्या पालकांना खूपच आनंद झाला. आपल्या मुलांमध्ये असे काही कौशल्य असेल याची कल्पनाही त्यांना नव्हती. एक छोटासा उपक्रम विद्यार्थ्यांच्या नवनवीन गुणांना वाव देणारा ठरला.

## उपक्रमाची फलनिष्पत्ती :

1) मुलांचा शब्दसंग्रह वाढला. 2) आई-वडिलांचीनाते दृढ झाले. 3) आत्मविश्वास वाढला. 4) कृतीची क्रमवारी लावण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आली. 5) मुलांना चांगले ऐकण्याचे माध्यम निर्माण झाले.

**प्रतिभा शिवाजी उभाळे.**
**जि .प .शाळा पिंप्री बुद्रुक (डांभुर्णी )**
**ता. पाचोरा, जि. जळगाव**

***



# उपक्रम क्र. ९

## कल्पक होऊया

इयत्ता : दुसरी

विषय : मराठी

पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्रमांक- 02.01.17 विद्यार्थी एखादी कथा/ कविता स्वतःच्या कल्पनेने पूर्ण करतात.

उपक्रमाची गरज : कल्पकता हा नवनिर्मितीचा, सर्जनशीलतेचा पाया आहे. विद्यार्थी कल्पक असतात त्यांच्या कल्पकतेला पुरेसा वाव देण्यासाठी त्यांना नवनिर्मितीकडे वळविण्यासाठी हा नवीन उपक्रम वर्गात राबविला .

उपक्रमाचे कृतीपूर्व नियोजन : प्राणी, पक्षी, व्यक्ती यांचे चित्र व कथांचे तक्ते गोळा केले.

उपक्रमासाठी लागणारे साहित्य : प्रोजेक्टर, प्राणी, पक्षी,व्यक्ती चित्रे, कथा तक्ते.

उपक्रमाचा कालावधी : शिक्षकाच्या नियोजनाप्रमाणे भाषेच्या तासिका.

उपक्रमाची कृती व कार्यवाही : विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी खालील कृती घेतली. 1) विद्यार्थ्यांना काही चित्रे प्रोजेक्टरवर दाखविले. त्यावर विचार करायला वेळ दिला. विद्यार्थ्यांनी चित्रांशी संबंधीत शब्द/वाक्ये वहीत लिहिली.

2) फळ्यावर एक शब्द लिहिला (उदा. झाड) त्यावर विचार करायला वेळ दिला. विद्यार्थ्यांनी त्या शब्दा विषयी काही वाक्य कल्पकतेने वहीत लिहिली.

3) प्रोजेक्टरवर एक अपरिचित कथा दाखविली आणि कथेचा शेवट होण्या पूर्वीच कथा बंद करून पुढे काय झाले असेल? असा प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना विचार प्रवृत्त केले. 4) दोन व्यक्ती /प्राणी /पक्षी यांचे चित्र दाखवून दोघे काय बोलत असतील? असा प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना दिली. 5) सोप्या कवितांच्या ओळी पूर्ण करण्यास दिल्या. विद्यार्थी अशा काही पायऱ्या चढल्यानंतर स्व -कल्पनेने कथा कविता पूर्ण करतात. काही निवडक कथा वर्गासमोर सादर केल्या. काही कथा भिंतीवर चिकटविल्या.

फलनिष्पत्ती : 1) विद्यार्थ्यांनी नवनिर्मितीचा आनंद घेतला. 2) स्वतःचे विचार व्यक्त करण्याची कला विद्यार्थ्यांना अवगत झाली. ३) अबोल विद्यार्थी बोलू लागले. 4) विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव झाला. अशा प्रकारे साचेबद्ध / चाकोरीबद्ध जगण्याला छेद देत विद्यार्थ्यांनी नवनिर्मितीतून आनंद मिळविला.

दीपा सुभाष बोडखे

जि. प. प्राथ. विद्यामंदिर तारखेडे बु.

ता.पाचोरा जि.जळगाव

***



# उपक्रम क्र. १०
## जादुई पिटारा

**इयत्ता :** पहिली

**अध्ययन निष्पत्ती :**

विविध उद्देशांसाठी स्वतःच्या भाषेचा वापर करून गप्पा गोष्टी करतात व स्वतःचे अनुभव सांगतात.

**कालावधी :**

वर्षभर (निरंतर चालणारी प्रक्रिया)

**उपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही :**

1) इयत्ता पहिलीची मुले असल्यामुळे प्रथम एक सुंदर बड - बड कृतीयुक्त गीताने सुरुवात केली.

माझ्या हातात जादू आहे बघा बघा बघा<br>
दोन हरण मोठे डोळे<br>
उंच उभे कान....

2) कृतियुक्त गाण्यामुळे सर्व मुलांचे लक्ष माझ्याकडे केंद्रित झाले आणि त्यांना मी सांगितले की आज मी तुम्हाला एक गंमत दाखवणार आहे. 3) आज वर्गात मी एक जादूचा खोका एक जादूचा पिटारा आणलेला आहे आणि बघा त्या पिटाऱ्यात काय जादू आहे. 4) एक रंगीत सजवलेला खोका टेबलवर ठेवला. 5) प्रथम एका मुलाला जवळ बोलावून खोक्यातील एक वस्तू काढण्यास सांगितले. 6) मुलाने त्यातून प्रथम एक चष्मा बाहेर काढला त्याला प्रथम वस्तू विचारली. 7) आणि चष्मा याबद्दल त्या मुलाला माहित असणाऱ्या काही गोष्टी त्याच्या शब्दात सांगण्यात सांगितल्या. खूप सुंदर अनुभव मुलाने सांगितले की माझ्या आजोबांचा चष्मा काळ्या रंगाचा आहे. आजीचा चष्मा वेगळा आहे. मी कधीकधी गमतीने डोळ्यांना चष्मा लावतो परंतु माझी मम्मी मला डोळ्यांना चष्मा लावू देत नाही.



माझ्या आजोबांचा चष्मा मी नेहमी शोधून नेऊन देतो. 8) एका मुलीने पेटाऱ्यातून बाहुली काढली. आणि त्याबद्दल तिला जे वाटले ते सगळ्या मुलांसमोर तिच्या शब्दात सांगण्यास सांगितले. मुलीने तिच्या बालपणीच्या आठवणी वर्गामध्ये सगळ्या मुलांसमोर सांगितल्या. तिची घरी असणारी बाहुली, तिला कशी तिने सजवली, असे छोटे-छोटे अनुभव तिने सगळ्यांना सांगितले. 9) पुढच्या विद्यार्थ्याने एक शेताचे चित्र बाहेर काढले. हे चित्र मुलाच्या भावविश्वातील ओळखीचे होते. कारण माझा विद्यार्थी हा ग्रामीण भागातील आहे त्यामुळे त्याबद्दल त्याने शेताचे चित्र पाहून शेताचे वर्णन त्याच्या शब्दात अतिशय सुंदर रित्या सांगितले. त्यामध्ये इतर विद्यार्थीही सहभागी झाले. आणि आई वडिलांबरोबर शेतात गेल्यावर शेतामध्ये काय काय गमती जमती केल्या, कसे आवळे - बोर तोडले, आंबा - कैरी यांची मजा लुटली, अशा बऱ्याच गोष्टी सर्व मुलांनी एकत्रित गप्पागोष्टी करून सगळ्यांसमोर मांडल्या. माझा हेतू साध्य झाला. 10) अशाप्रकारे विविध वस्तू पीटारा मधून काढून अतिशय सुंदर प्रकारे चर्चांमध्ये सहभागी होऊन आपले विचार, कल्पना, गोष्टी याद्वारे संवाद घडवून आणला.

## वाचन कोपरा :

माझ्या वर्गात तयार केलेला विविध शब्दांच्या वाचन कोपरा याचाही मी या उपक्रमासाठी मदत घेतली. 1) मुलांना आवडणाऱ्या कोणत्याही वाचन कोपऱ्यातील एका शब्दाची निवड करून तो शब्द त्याला प्रथम वाचण्यात सांगितला 2) आई हा शब्द वाचल्यावर आई या शब्दाबद्दल त्याच्या भावविश्वातील विविध अनुभव त्या मुलास विचारले. 3) अशाप्रकारे मुलांना विविध प्रश्न विचारून चित्र दाखवून वस्तू दाखवून मुलांना बोलते केले. 4) यामुळे माझे विद्यार्थी अतिशय मुक्तपणे बोलत होते आणि पूर्णपणे व्यक्त होत होते.

## पूरक उपक्रम :

1) तुमच्या गावातील यात्रेत काय काय असते ते सांगा. 2) सुट्टीमध्ये मामाच्या गावाला कोणत्या कोणत्या गमतीजमती करतात ते तुमच्या शब्दात सांगा. 3) तुम्हाला आवडणारे तुमच्या भाषेतील



एखादे गाणं सगळ्यांसमोर म्हणा. 4) मोबाईलच्या मदतीने इतर बोलीभाषेतील गाणी मुलांना ऐकविली. 5) प्रोजेक्टर वर सुंदर सुंदर छोट्या कथा दाखवून त्यावर प्रश्न विचारले.

## उपक्रमाची फलनिष्पत्ती :

हा उपक्रम मी माझ्या पहिलीच्या वर्गात निरंतर घेत आहे. कारण इयत्ता पहिलीचा विद्यार्थी पहिल्यांदा शाळेतील नवीन वातावरणात आलेला असतो आणि म्हणून प्रथम त्याला शाळा, शिक्षक, विद्यार्थी याबद्दल आवड निर्माण होणे गरजेचे असते. त्याचे मन रमले पाहिजे, त्याला आवड निर्माण झाली तरच तो रोज शाळेत येईल हे मी स्वतः अनुभवले आहे. काही मुले सुरुवातीला काहीच बोलत नाही कारण ते घाबरत असतात. काही मुलांची बोली भाषा भिन्न असते. त्यासाठी मुलांना बोलते करणे फार गरजेचे असते. त्यामुळे वरील अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी मी माझ्या इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले. वातावरण निर्मिती केली आणि त्यामुळे माझी मुलं ही व्यक्त होऊ लागली. त्यांच्या भावना त्यांच्या विचार कल्पना सगळ्यांसमोर मांडू लागले. त्यांच्यामधील बदल मला जाणवले.

1) अबोल लाजरी मुले धीटपणे आपले विचार सगळ्यांसमोर मांडू लागली. 2) एखाद्या अध्ययन अनुभवात चर्चेत उस्फूर्तपणे सहभाग घेऊ लागली. 3) कल्पना अनुभव सांगितल्याने मुलांचा आत्मविश्वास वाढला. 4) ह्या उपक्रमामुळे मुलांच्या स्वअभिव्यक्तीला वाव मिळाला. 5) मुले स्वतःच्या बोलीभाषेत सगळ्यांशी संवाद साधू लागले. 6) मुलांना बोलण्याचे स्वातंत्र्य व संधी मिळाली. 7) मुलांच्या शब्दसंपत्ती वाढ झाली व मुलांना नवनिर्मितीचा आनंद मिळाला. 8) काही मुले आपल्या बोलीभाषेतही त्यांचे विचार, कल्पना, गोष्टी वर्गांमध्ये सांगू लागले. एकमेकांशी बोलू लागले. 9) रोजच्या दैनंदिन परिपाठामध्ये उत्साहाने आणि आनंदाने उस्फूर्तपणे सहभाग नोंदवू लागले.

**वैशाली पुंडलिक पाटील**
**जि प पूर्ण प्राथमिक शाळा बाळद बुद्रुक ता. पाचोरा जि. जळगाव**

***

पुस्तकांच्या सहवासात शांत आयुष्य वेचण्यासारखा दुसरा आनंद नाही.



# उपक्रम क्र. ११

# Rolling the balls

Class: 1 to 5 standard

Subject: English

Level:

Beginners, preintermediate

Language skill: Listening and Speaking

Learning outcomes:

1) To help students for warm up to improve their speaking skill.
2) Practice for speaking English.
3) To increase the vocabulary of the students. 4) To develop the listening and speaking skill of students. 5) To collect more words about the title.

Time required: 20 minutes per day for whole year

Materials required: A Big ball

Interaction pattern: Individual

Procedure: 1) Make a circle of all students of our class on Playground or in classroom. (We can take this activity in classroom on the benches as the student's seat everyday.) 2) The teacher will tell all the rules of the activity to all students. 3) Teacher will show all the students ball. 4) The teacher will throw the ball to any student and say any subject like School. 5) The student should say the word about school. Example - Classroom 6) Then the teacher will say roll the ball to some students after some time teacher will say stop. Then who have the ball the students should say the word about classroom Example -Black board

7) Then the students will roll the ball. When the Teacher say stop the students who have the ball should say word about blackboard. Example - Chalk

In this way the game will continue. This is very interesting game. The student who will not say any word he will be out from

a game. Who will be there at the end of game the student will be the winner.

Variation -

We will take this game another way. In the above game we take the word chain.

Example -School - Classroom - Blackboard - Chalk - White - shirt- Silk -saree - Blue - whale- fish - see......In this game we take the varied words. But we can take any one subject like only school. We will take for few minutes the one subject and then in second section we will change the subject.

Example -

1) Games 2) Colours 3) Wild animals pet animals 4) School bag 5) Our home 6) Play ground 7) Railway station 8) Musical Instruments 9) Jungle 10) Study room. In this way we will take the game in another way.

Jyoti Arun Mahajan
Z. P. P. S. Pardhade
Tal. Pachora, Dist. Jalgaon

***

The difference between school and life?
In school, you're taught a lesson and then given a test.
In life, you're given a test that teaches you a lesson.

Tom Bodett



# उपक्रम क्र. १२
# वाचन माझे लेखन तुमचे

**विषय :** भाषा

**हेतू :**

१. श्रवण शक्तीचा विकास करणे.

२. मुलींची एकाग्रता वाढविणे.

३. मुलीचे वाचन व लेखन सुधारणे.

४. स्व आत्मपरिक्षण करणे.

**उपक्रमाच्या कृतीचे पूर्वनियोजन :**

मुलींचे ७-७ याप्रमाणे ५ गट तयार केले. गटातील मुलींना गोलाकार बसविले. त्यांच्याकडून सोपे शब्द वाचन व लेखन करण्याचा सराव घेतला.

**साहित्य :**

शब्दकार्ड, वाक्यपट्ट्या, वर्तमानपत्रे, छापील मजकूर.

**कालावधी :** वाचन व लेखन ही तर वर्षभर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे हा उपक्रम वर्षभर घेता येतो.

**उपक्रमाची कार्यवाही :** प्रथम विद्यार्थिनींकडून वाचन व लेखन करून घेतले. त्यानंतर विद्यार्थिनींचे ७-७ प्रमाणे गट तयार करून घेतले. नंतर गटातील मूलीना गोलाकार बसवून घेतले. प्रत्येक गटातील गट प्रमुख दहा शब्दांचे /वाक्यांचे वाचन करतात. गटातील मुली ते शब्द मन लावून ऐकतात. मुली ते सर्व शब्द ऐकून लिहित असतात. सर्व शब्द लिहून झाल्यावर मुली ते शब्द पुस्तकात पाहून स्वतः तपासतात व चूकलेल्या शब्दांना गोल करतात. नंतर चुकलेले शब्द परत लिहायला सांगितले जाते. त्यामुळे वाचताना मुली चुकलेले शब्द पुस्तकात वाचतात व त्या शब्दांचे परत लेखन करतात. अशा प्रकारे दररोज गटातील प्रत्येक मुलीला वाचनाची संधी देऊन शब्दांचे/वाक्याचे लेखन करावे. यामुळे मुली स्वतः वाचन करून लेखन करतात. स्वतःच्या चुका शोधून परत लिहीत असतात. या उपक्रमात मुली एकाग्र होऊन शब्द ऐकतात व त्यांचे लेखन करतात. त्यामुळे या उपक्रमातून मुलींची एकाग्रता वाढते व वाचन सुधारते. मुली शुद्ध लेखन करतात.

**उपक्रमाची निष्पत्ती :**

१) विद्यार्थ्यांच्या श्रवण शक्तीचा विकास झाला. २) मुलींची एकाग्रता वाढली. ३) वाचनाची गोडी निर्माण झाली. ४) श्रुतलेखनाची सवय जडली. ५) लेखनातील चूका कमी होतात. ६) अवांतर वाचनाची गोडी निर्माण झाला. ७) विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढली. ८) विद्यार्थी स्वआत्मपरीक्षण करायला लागले. ९) विद्यार्थी गटकार्य करताना आनंदी झाली. १०) गटात कार्य केल्यामुळे सहकार्य वृत्ती वाढली. ११) विद्यार्थी शुद्ध लेखन करतात तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढतो. १२) वाचन सुधारल्यामुळे उच्चार स्पष्ट होतात.





## माझ्या वर्गातील विद्यार्थिनींबद्दल थोडक्यात

१) माझ्या वर्गातील साक्षी नरेंद्र पालिवाल व योगेश्वरी एकनाथ चौधरी या विद्यार्थिनी चालू वर्षी स्वच्छता अभियानांतर्गत झालेल्या स्पर्धेत तालुक्यात प्रथम व द्वितीय आल्या आहेत. २) तसेच याच वर्षी साक्षी नरेंद्र पालिवाल ही मतदार राजा जागा हो ! या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली. ३) माझ्या वर्गातील समीक्षा शिवाजी क्षीरसागर ही स्वच्छता अभियानांतर्गत झालेल्या निबंध स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली व ती या वर्षीच्या MTS परीक्षेत लोहारा केंद्रातून प्रथम आली आहे. तसेच तिने मतदान जागृती विषयावरील रांगोळी स्पर्धेत या वर्षी पाचोरा तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. ४) गट कार्यामुळे मुलींची एकमेकांमध्ये आंतरक्रिया होते. मुली गटातील इतर मुलीशी संवाद साधतात. याचा फायदा ज्या मुली अबोल असतात त्या चर्चेत सहभाग घेतात व आपले मत मांडतात.

**शीतल भागवत महाजन**
**जि. प. मराठी मुलींची शाळा लोहारा**
**ता. पाचोरा जि. जळगाव**

***

प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे,
म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे.



# उपक्रम क्र. १३

## खेळ खेळूया,

## बेरीज वजाबाकी शिकूया.

**इयत्ता :** दुसरी

**उपक्रमासाठी विषय :** गणित

**पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्रमांक :**

02. 71.01 (दोन अंकी संख्यांच्या बेरजेवर वर आधारित दैनंदिन जीवनातील साधे प्रश्न किंवा समस्या सोडवतात.)

**उपक्रम कृतीचे पूर्वनियोजन :**

इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांना 1 ते 10 अंकांची बेरीज वजाबाकी सोपी वाटते. आणि ते ती सहज पण करतात. पण दोन अंकी बेरीज वजाबाकी थोडी अवघड वाटते. दगड-गोटे, काड्यांच्या सहाय्याने अध्ययन अनुभव देऊन प्रत्यक्ष बेरीज वजाबाकी चा सराव घेतला पण वर्गात काही विद्यार्थी असे असतात की त्यांच्या कलेनेच घ्यावे लागते काही विद्यार्थी खूप खेळकर असतात. खेळातून त्यांना लवकर समजते. तेव्हा बेरीज-वजाबाकी चा सराव खेळाद्वारे करण्याचे मी ठरवले आणि खेळ खेळूया बेरीज-वजाबाकी शिकूया या उपक्रमाचे साहित्य मिळवण्याचा प्रयत्न केला आणि साहित्याची जमवाजमव केली.

**साहित्य :** कॅरम बोर्ड, सोंगट्या, (striker) स्ट्रायकर, फेविकॉल, कार्डशिट, कात्री, मार्कर पेन, वही, पेन इत्यादी.

**कालावधी :** तीन आठवडे

1) पहिला आठवडा गणिताच्या तासिका : बेरीज खेळ 2) दुसरा आठवडा गणिताच्या तासिका : वजाबाकी खेळ 3) तिसरा आठवडा गणिताच्या तासिका : बेरीज- वजाबाकी एकत्रित खेळ

**कार्यवाही :**

सर्व प्रथम सर्व विद्यार्थ्यांना खेळाविषयी पूर्वकल्पना दिली. आणि त्यांच्याकडूनच उपक्रमांची तयारी करून घेतली. अगोदर 10 मुले व 10 मुलींना 1-1 कार्डशिट देऊन त्यावर सोंगट्या च्या आकाराचे गोल पेन्सिलीने आखून घेतले असे कार्डशिट चे 20 गोल कापून घेतली त्यावर मार्कर पेनने 1 ते 20 असे अंक लिहून ते आकार फेविकॉल ने सोंगट्यावर चिकटवली. बेरीज वजाबाकी चिन्हांच्या सोंगट्या तयार केल्या. आणि प्रत्यक्ष खेळाला सुरुवात केली. कॅरम बोर्ड वर सर्व सोंगट्या मधोमध मांडून कॅरम बोर्डच्या प्रत्येक बाजूला 2-2 विद्यार्थी असे कॅरमच्या चारही बाजूने 8 विद्यार्थी बसवले. त्यांच्याजवळ वही-पेन देण्यात आले. कॅरमच्या समोरासमोरचे चार विद्यार्थ्यांचा एक गट बेरीज करतील व दुसऱ्या समोरासमोरचे चार विद्यार्थीचा दुसरा गट वजाबाकी करतील. (Striker) स्ट्रायकरने ज्या सोंगटीला स्पर्श झाला उदाहरणार्थ 7 या सोंगटीला स्पर्श झाला तिला बाजूला काढायची व परत स्ट्रायकरने खेळायचे. परत दुसऱ्या ज्या सोंगटीला स्पर्श केला उदाहरणार्थ 8 या सोंगटीला





स्पर्श केला ती सोंगटी आणि पहिली सोंगटी बाजूला करून त्यांची बेरीज करायची. ते गणित किंवा उदाहरण विद्यार्थी वहीत मांडतील आणि सोडवतील उदाहरणार्थ ( 7+ 8 =15) दुसरे दोन विद्यार्थी खेळतील आणि गणित मांडतील (10+19 =29) जर बेरजेच्या गटातील विद्यार्थ्यांनी बेरीज चुकीची केली तर वजाबाकीच्या गटाला खेळण्याची संधी मिळेल. आता कॅरम बोर्डच्या दुसऱ्या वजाबाकी गटाच्या विद्यार्थ्यांना कॅरम खेळण्यास सांगून तशीच कृती विद्यार्थी करतील आणि वजाबाकीची उदाहरणे सोडवतील उदा. 6 – 3 = 3, 17 – 12 = 5 अशा पद्धतीने विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त बेरीज वजाबाकीचा सराव कॅरम खेळाच्या माध्यमातून करून घेतला.

**फलनिष्पत्ती :** 1) या उपक्रमामुळे पटापट करू लागले. 2) विद्यार्थ्यांना अंकवाचन लेखनाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला. 3) विद्यार्थी उदाहरण सोडवताना चुकला तर अन्य विद्यार्थी त्याला मदत करतात. 4) कृतीतून खेळातून तसेच समवयस्ककातून मिळालेले ज्ञान चिरकाल स्मरणात राहते. 5) विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळते. 6) विद्यार्थी दैनंदिन जीवनातील बेरीज-वजाबाकी वर आधारित सोपे सोपे हिशोब करतो. 7) खेळामुळे दिवसभराच्या अभ्यासाचा क्षीण घालवता येतो. 8) संख्या ज्ञानाचे दृढीकरण होते. 9) विद्यार्थ्यांच्या निरीक्षण शक्तीचा विकास होतो. 10) योग्य उदाहरण मांडणी करता येते. 11) अचूक उदाहरणे सोडवता आल्याने आनंदी वृत्ती निर्माण होते. 12) गणिताविषयी आवड निर्माण होते.


**विजया भालचंद्र पाटील.**

**जि. प. केंद्रीय पूर्ण प्राथमिक शाळा**

**बाळद बु. ता. पाचोरा जि. जळगाव.**


***



# उपक्रम क्र. १४

## ‘वांग्याचं देठ मला येऊन भेट’

इयत्ता : चौथी

उपक्रमाचा विषय : मराठी गणित

संबंधित निष्पत्ती :

1) 04.71.03 समजपूर्वक वाचन करून वाचलेला मजकूर व दैनंदिन अनुभव यांची सांगड घालतात. 2) भाषा संपत्तीत वाढ होते. सहसंबंध समजून येतात.

उपक्रमाच्या तासिका : दररोज खेळायचा एक तास

उपक्रम कृती व कार्यवाही : विद्यार्थी गोलाकार बसवून आधी एक खेळ घेतला. एका विद्यार्थ्याचे डोळे झाकून त्याला आवाज दिल्यावर आवाजावरून आपल्या मित्राला ओळखायला सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गातल्या सर्व मुलांचे आवाज ओळखले. बरोबर उत्तर देणाऱ्याला शाबासकी दिली. सर्वांना खेळात आनंद मिळाला. पुढील तासीकेला आपण आणखी एक नवीन खेळ खेळणार आहोत असे सांगितले. सगळ्यांचा पुढच्या तासिके बाबत उत्साह वाढला. वर्ग संख्या जास्त असल्याने वीस-वीस मुलांचे दोन गट पडले.



एका गटाला निरीक्षण करायला सांगितले व दुसऱ्या गटाला काही चिठ्ठ्या वाटल्या. प्रत्येक मुलाला एक चिठ्ठी याप्रमाणे 20 मुलांच्या वीस चिठ्ठ्या वाटल्या आणि सांगितले की प्रत्येकाला आपली जोडी शोधायची आहे. कारण या 10 जोडीचिठ्ठ्या आहेत.

| | |
|---|---|
| ढग | पाऊस |
| पाय | बुट |
| सुई | दोरा |
| ऊस | गुळ |

अशा काही जोड्या त्यात लिहलेल्या होत्या. दहा जोड्यांपैकी दहा मुलांना आणि दहा मुलींना समोरासमोर उभे केले. मात्र त्यात त्यांच्या जोड्या नव्हत्या. समोरासमोर उभ्या असलेल्या एका रांगेतल्या मुलांनी प्रत्येकाने आपल्या



चिठ्ठीतले शब्द वाचायचे होते. समजा चिठ्ठीतला शब्द वाचला ढग. तर त्याची जोडी असणारी चिठ्ठी ज्याच्याकडे आहे त्याने असे म्हणायचे 'वांग्याचं देठ मला येऊन भेट' आणि त्यांनी एकमेकांची भेट घ्यायची, आपली जोडी पक्की करायची, नंतर आपल्या जोडीच्या चिठ्ठीचे वाचन करून सांगायचे. अशाप्रकारे जोड्या झालेल्या मुलांना नवीन शब्दसंपत्ती कळाली. स्वतःच्या विचाराने आपली जोडी कोणती असेल हेही त्यांनी ठरवले. आणि एक नवीन अनुभव आला की, 'वांग्याचं देठ मला येऊन भेट' असं वाक्य बोलतांना गंमत वाटायची. पुढच्या तासीकेला काही नियम बदलून नवीन चिठ्या केल्या. समोरासमोर उभे न करता जो चिठ्ठी वाचेल त्याने पाठमोरे उभे राहायचे व आपल्या चिठ्ठीतला शब्द वाचायला जोडीचिट्ठी असणाऱ्याने आपल्या मित्राला आवाज द्यायचा 'वांग्याचं देठ मला येऊन भेट'. आवाजावरून त्याने आपल्या जोडीदार ओळखायचा. चिट्ठीमधील मजकूर बदलूनह विविध पाठ घटकावर असा खेळ घेतला. यात पिल्लूदर्शक शब्द, घरदर्शक शब्द, वाक्प्रचाराचा अर्थ, म्हणी पूर्ण करा इत्यादी वेगवेगळ्या जोडीचिठ्ठ्या घेऊन खेळ घेतला. गणितातल्या संख्या व स्थानिक किंमत, विस्ताररुप या जोड्या घेऊन हा खेळ घेतला. परिसर अभ्यासाच्या प्राणी व निवारा यांची जोडी घेऊनही हा खेळ घेतला. खेळाचे वाक्य मुलांना इतके आवडते की नाचत-नाचत आपली जोडी शोधतात आणि म्हणतात 'वांग्याचे देठ मला येऊन भेट'.

अध्ययन फलनिष्पत्ती : विद्यार्थ्यांना या खेळाचा आनंद झाला आणि वर्गात खेळाच्या माध्यमातून वरील अध्ययन निष्पत्ती ही चांगल्याप्रकारे घडून आली. प्रत्येक विद्यार्थ्याने सक्रिय सहभाग नोंदवला आणि शेवटी का होईना पण अडखळत असणारे मुलं सुद्धा आपली जोडी शोधून खेळात सहभागी झाले.

**वनिता यादवराव जिकाटे**
**विषय साधन व्यक्ती**
**गटसाधन पाचोरा,**
**तालुका पाचोरा जिल्हा जळगाव**

***

पुस्तके म्हणजे मन निर्मळ करणारा अविश्रांत झरा आहे.



# उपक्रम क्र. १५
## अक्षर लेखन

इयत्ता : १ ली

विषय : भाषा.

अध्ययन निष्पत्ती क्रमांक :

१.०१.११ वर्णमलेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात.

उपक्रमाचे कृतीपूर्व नियोजन : उपक्रमाचे नियोजन करताना विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आपण काहीतरी नवीन करणार आहोत हे सांगून १५ ऑगस्टसाठी वापरलेले पताका ज्या आम्ही संभाळून ठेवल्या होत्या व पुठ्ठे यांची जमवाजमव करणे महत्त्वाचे होते व त्याकरिता विद्यार्थ्यांनी रिकामे साडीचे खोके जमवले.

उपक्रमासाठी लागणारे साहित्य : पताका, पुठ्ठे, डिंक / फेव्हीकॉल

उपक्रम कालावधी : दोन आठवड्यातील दोन शनिवार

उपक्रमाची कृती : आठवड्यातील प्रत्येक शनिवार म्हणजे उपक्रमाचा दिवस हे ठरलेले असते. विद्यार्थ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

पहिला शनिवार :

या दिवशी रंगीत पताकांचे तुकडे करून घेऊन ते चुरगळुन त्यांचे गोळे तयार करून घेतले. पुठ्ठे चौकोनी आकारात कापून त्यावर अक्षर लेखन केले.

दुसरा शनिवार :

या दिवशी उपक्रमाला सुरुवात करायची म्हणून पुढील प्रमाणे कार्यवाही केली. १) सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे प्रत्येक गटात सहाजण याप्रमाणे सहा गट केले. २ ) सर्व विद्यार्थ्यांना गटनिहाय गटनायक नेमला. ३) गटनायकला सांगून प्रत्येक गटाला कागदाचे गोळे व फेव्हीकॉल ची बॉटल दिली. ४) त्यानंतर तयार अक्षर कार्डाचे वाटप करून प्रत्येक विद्यार्थ्याने त्याला मिळालेले अक्षर कार्ड मोठ्याने वाचले व सर्वांना दाखवले. ही कृती करून घेतली.





५) कोलाज कसे करावे याविषयी सूचना दिल्या, कोलाज करताना एक एक गोळा घेऊन तो अक्षराच्या वळणाप्रमाणे ठेवावा असे सांगत मी स्वतः प्रत्यक्ष करून दाखवले. ६) ज्या गटाचे कोलाज अगोदर झाले किंवा गटातील ज्याचे कोलाज अगोदर झाले ते इतरांना हवी असल्यास मदत करत होते.

७) ज्याचे काम पूर्ण झाले तो मला दाखवून त्याचे वाचन करीत होता. काही सुधारणा असल्यास त्या करीत होता. ८) उपक्रमात विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले होते. काम चांगले कसे होईल याची खबरदारी घेत होते. प्रत्येक विद्यार्थी आपले काम करण्यात गढुन गेला होता.

## फलनिष्पत्ती :

१) नवीन उपक्रमाचा आनंद झाला व स्वतः काम करण्याचा अनुभव मिळाला. २) अक्षराचे वळण व ध्वनी यांचे दृढीकरण झाले. ३) विविधरंगी कागदाचे तुकडे करताना त्यांची सहज प्रवृत्ती जोपासली गेली.



४) गोळे चिकटवतांना रंग वापराच्या बाबतीत स्वतःची कल्पकता दाखवता आली.

**स्वाती मनोज महाजन**

**जि.प.बेसिक शाळा लोहटार**

**ता. पाचोरा जि. जळगाव**

***

---

कले शिवाय जीवन म्हणजे सुगंधा शिवाय फूल
आणि प्राणा शिवाय शरीर!

बदलण्याची संधी नेहमी असते
पण बदलण्यासाठी तूम्ही वेळ काढला का?



# उपक्रम क्र. १६
# वाढवूया आपली शब्दसंपत्ती

इयत्ता : दुसरी

उपक्रमासाठी विषय : भाषा (भाषा – गणित समवाय)

पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्तीचा क्रमांक 02.01.11 लिखित / कापलेल्या मजकुरातील अक्षर, शब्द आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात. उदा. 'माझे नाव विमल आहे.' सांगा यात किती शब्द आहेत ते?/ यातील विमल शब्दात किती आणि कोणकोणती अक्षरे आहेत?

उपक्रमासाठी लागणारे साहित्य : 1) अक्षरकार्ड 2) शब्दकार्ड 3) वाक्यपट्ट्या 4) रंगवलेले रंगीबेरंगी दगड (साधेही खडे घेतले तरी चालतील) 5) वर्तमानपत्रं सारखे छापील मजकूर 6) वर्गातील इतर साहित्य, खडू, फळा, इत्यादी

उपक्रमाच्या कृतीचे पूर्वनियोजन : सहा – सहा विद्यार्थ्यांचे गट करून त्यांच्याकडून मुळाक्षरे, साधे शब्द, शब्दातील अक्षरे कोणती ते ओळखा व एकमेकांना सांगा असा सराव करून घेतला.

कालावधी : वाचन व लेखन, गणन ही तर वर्षभर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे आपण केव्हाही हा उपक्रम घेऊ शकतो. अगदी विद्यार्थ्यांचे पालक सुद्धा त्यांच्याकडून रोज सराव करून घेऊ शकतात.

उपक्रमाची कार्यवाही :

1) प्रथम विद्यार्थ्यांचे मुळाक्षरांचे वाचन घेतले. त्यानंतर विद्यार्थ्यांचे सहा – सहा विद्यार्थी याप्रमाणे गट केले. 2) यानंतर प्रत्येक गटाने एकेक करून एक शब्द सांगायचा. कोणताही शब्द म्हणजे आपल्या वर्गातील, घरातील, परिसरातील कोणताही शब्द सांगायचा. 3) उदा. माझ्या वर्गातील विद्यार्थ्याने मानव हा शब्द सांगितला. तो शब्द मी फळ्यावर लिहिला. मग त्यांना विचारले की मानव या शब्दात किती अक्षरे आहेत. विद्यार्थ्यांनी 3 सांगितले. त्यानंतर मी उभ्या मांडणीने तो शब्द लिहिला.

मा =

न =


व =

म, मा पासून सुरू होणारे शब्द न पासून सुरु होणारे आणि व पासून सुरु होणारे शब्द सांगा. प्रत्येकाने सांगितलेले शब्द फळ्यावर लिहिले. शब्दांचा जणू डोंगरच तयार झाला.

मा = मामा,माठ, मधमाशी, मार, मगर,इत्यादी

न = नर, नस ,नदी, नळ, इत्यादी

व = वजन, वचक, वाचन, वर, इत्यादी याप्रमाणे अनेक शब्द विद्यार्थ्यांनी सांगितले. 4) सर्वच गटांनी वेगवेगळे शब्द व त्या अक्षरांपासून अजून नवीन शब्द बनवले. 5) अशाप्रकारे विद्यार्थी स्वतः शब्दांपासून वेगवेगळे शब्द बनवायला लागले. 6) बसवरील वेगवेगळी चित्रे, गावातील दुकानांवरील पाट्या, त्यातील शब्द, वर्तमानपत्रातील ठळक शब्द ते वर्गात येऊन सांगू लागले आणि त्यापासून नवीन शब्द बनवू







लागले. 7) **या शब्दांमुळे बेरीज, वजाबाकी, लहान-मोठ्या संख्या इत्यादी गणिती क्रियाही अगदी हसत खेळत मुलांनी केल्या.**

उदा. मी फळ्यावर शब्द लिहिला वडगाव

व= ----------------------

ड= -----------------------

गा= -----------------------

व= -----------------------

मुलांनी पटपट शब्द बनवले (प्रत्येक अक्षरापासून सुरू होणारे) त्यानंतर त्यांना मैदानावर नेले. गोल रिंगण करून आपापल्या वह्या घेऊन बसवले. 'व' च्या गटात जेवढे शब्द तेवढे खडे (रंगीत असतील तर ते घ्यावे) ड, गा, व यांच्या गटात जेवढे शब्द तेवढे खडे घ्यायला सांगितले. व + ड + गा + व = या प्रमाणे मोजून त्यांना बेरीज करायला सांगितली. त्यामुळे विद्यार्थी पटापट बेरजा 3 + 2+ 3 +1 करू लागले. भाषा व गणिताची सांगड घातली गेली. 8) याच पद्धतीने मी लहान, मोठी संख्या ही विद्यार्थ्यांना शिकवली. 9) विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शब्दांमधून त्यांना कोणतेही दोन किंवा तीन शब्द देऊन वाक्य तयार करण्यास सांगितले.

उदा. गारवा, हवा, पाऊस हे शब्द वापरून वाक्य बनवा हळूहळू सराव झाल्यावर विद्यार्थी सहजच वाक्य तयार करायला लागले. 10) **ज्या विद्यार्थ्यांकडे वर्तमानपत्र असेल त्या विद्यार्थ्यांनी त्यातील ठळक शब्द कापून वहीत चिटकवायचे** व त्यातील शब्दांपासूनही वाक्य बनवायचे. यामुळे मुले शाळेत, घरी, परिसरात कोठेही वाचन करायला प्रवृत्त होतात.

## उपक्रमाची निष्पत्ती :

1) विद्यार्थ्यांना निरीक्षणाची सवय लागते.

2) वाचनाची गोडी निर्माण होते. 3) संग्रह करण्याची वृत्ती जोपासली जाते. 4) श्रुतलेखनाची तयारी आपोआपच होते. 5) लेखनातील चुका हळूहळू कमी होतात. 6) विद्यार्थ्यांना गणिती क्रिया करायचाही आनंद मिळतो. 7) शब्द सांगताना मी सांगितलेला शब्द सरांनी/मॅडमने फळ्यावर लिहिला याचा आनंद मुलाला होतो आणि तो बोलका होता. भीती नाहीशी होते. 8) अवांतर पुस्तके वाचन करण्याची गोडी निर्माण होते. 9) विद्यार्थ्यांमध्ये कुतुहल निर्माण होते. 10) शब्द संपत्ती वाढते.

11) गटात कार्य केल्यामुळे सहकार्य वृत्ती वाढते.
12) माझ्या वर्गातील आयुष हा विद्यार्थी वर्तमानपत्रातील बातम्या देखील वाचतो.

वृषाली अरविंद सोनार
जि प प्राथमिक शाळा वडगाव आंबे
ता. पाचोरा जि. जळगाव

***

आयुष्यात असं काहीतरी मिळवा
जे तुमच्या पासून कुणीही चोरून घेऊ शकत नाही.

आयुष्यात खूपदा बुध्दी जिंकते....
ह्रदय हरतं पण बुध्दी जिंकूनही हरलेली असते
आणि ह्रदय हरून देखील जिंकलेलं असतं.

नम्रता ही शिक्षणाची पहिली पायरी आहे.

दुसऱ्याचा विचार करायला शिकला तोच खरा सुशिक्षित.

परीक्षा म्हणजे स्वत:च्या आत डोकावून पाहण्याची संधी !



# उपक्रम क्र. १७
# माझी किंमत ओळखा

**इयत्ता :** 1 ते 5 साठी

**अध्ययन निष्पत्ती :**

१) अंकांची दर्शनी किंमत ओळखणे. २) अंकांची स्थानिक किंमत ओळखणे. ३)संख्या वाचन करणे.

**साहित्य :** १) शून्य ते नऊ संख्या कार्ड २) डोक्यावरती एकक, दशक, शतक असे लिहिलेले मुकुट इ.

**उपक्रमाची कार्यवाही :** मुलांच्या डोक्यावर एकक, दशक, हजार याप्रमाणे मुकुट लावायचा व एका ट्रे मधून संख्याकार्ड त्यांना उचलायला सांगायचे. त्यानंतर क्रमाने रांगेत उभे करायचे. वर्गातील इतर विद्यार्थ्यांना संख्या ओळखायला सांगायची. संख्या ओळखण्यासाठी चॉकलेट, मी झकास क्लॅप असे काहीतरी बक्षीस द्यायचे. माझ्याकडे दुसरीचा वर्ग आहे माझ्या वर्गासाठी शतक पर्यंतच्या संख्या ओळखण्यासाठी, वाचण्यासाठी मी हा उपक्रम घेतला. त्यामुळे संख्या वाचता येते व स्थानिक किंमत देखील समजते. सर्वप्रथम एकक स्थानी असलेल्याने संख्याकार्ड घेतले व त्याने दोनदा म्हणायचे "मी एकक आहे, मी एकक आहे" मग आपली जागा घ्यायची. माझी जागा उजवीकडून पहिली याप्रमाणे दशक, शतक आपल्या स्थानाप्रमाणे म्हणतात व आपली जागा घेतात. त्यानंतर त्यांच्याकडे संख्या काढण्याचा ट्रे धरला व एक संख्या उचलायला सांगितली. संख्या कार्ड उचललं की झाली दर्शनी किंमत. ते घेऊन आपल्या जागेवर जाऊन तयार झालेल्या संख्यांचे वाचन घेतले. संख्यावाचन शिकल्यानंतर पुढचा टप्पा स्थानिक किंमत. त्या संख्याची स्थानिक किंमत ठरवायची ते समजविले. त्यांच्याकडे एक अंक दिला व उरलेल्यां कडे शून्याचे कार्ड दिले आणि मग ती संख्या वाचायला सांगितली. याप्रमाणे स्थानिक किमतीचा सराव घेतला. मुलांची संकल्पना पक्की झाली. संख्या वाचनाचा सराव घेतल्याने स्थानिक किंमत समजली. परिपाठाच्या वेळी दर शनिवारी सर्वच वर्गासाठी आम्ही हा उपक्रम घेतो. पहिली ते सातवीपर्यंतची शाळा असल्याने कोटी पर्यंतच्या संख्या मुले ओळखतात.

**फलनिष्पत्ती :**

१) विद्यार्थी संख्या वाचन करता आले. २) संख्यांची दर्शनी किंमत व स्थानिक किंमत यातील फरक सांगता आला. ३) स्थानिक किंमत समजली व सांगता आली. ४) संख्याज्ञान व संख्यांच्या स्थानिक किंमत यांचे दृढीकरण झाले. ५) आनंददायी खेळातून मनोरंजनही झाले. ६) कठीण वाटणारा गणित विषय सोपा वाटायला लागला.


स्वाती अमृतराव पाटील
जि. प. प्राथमिक शाळा, गोराडखेडा
ता. पाचोरा जि. जळगाव


***



# उपक्रम क्र. १८

## शब्द कोडी सोडवूया, शब्द तयार करूया

**विषय :** भाषा

**इयत्ता :** पहिली ते चौथीसाठी

**साहित्य :** खडू-फळा /वही-पेन

मुलं शाळेत येण्यापूर्वी घर आणि परिसरात राहून ऐकून भाषा बोलायला शिकतात. मुलांचे अनौपचारिक भाषा शिक्षण झालेले असते. आई वडिलांचे बोट धरून शाळेत दाखल झाले की त्याचा श्रवण, भाषण, संभाषण, वाचन, लेखन असे औपचारिक शिक्षण सुरू होते. मुलांच्या भाषा शिक्षणाची गती ही त्यांचा शब्दसाठा म्हणजेच शब्द संपत्तीवर अवलंबून असते. शाळेत घरासारखं मुक्त वातावरण असावं. शिक्षक विद्यार्थी यांच्यात सुसंवाद असावा. मोकळेपणानं बोलता यावे. खेळीमेळीच्या वातावरणात शिक्षक विद्यार्थी यांच्यात आंतरक्रिया व्हावी. प्रश्न विचारता यावेत. मुलांना स्वतःला येते ते इतरांना सांगता यावं. नीट लिहिता वाचता यावे यासाठी विद्यार्थ्याकडे शब्द साठा असणे महत्त्वाचे आहे. जितका शब्दसाठा जास्त तितका त्या मुलाची भाषिक कौशल्यासह विचारशक्ती विकसित होण्यास चालना मिळते म्हणूनच विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवावा या दृष्टीने हा उपक्रम राबवण्यात आला. "शब्दकोडे सोडवूया शब्द तयार करूया"

### उपक्रमाची कृती :

उपक्रमाच्या सुरुवातीला प्रथम फळ्यावर आवश्यकते नुसार चौकट आखून प्रत्येक चौकटीमध्ये अर्थपूर्ण शब्द तयार होतील अशी अक्षरे, स्वरचिन्ह युक्त किंवा स्वरचिन्ह विरहित अक्षरे उलट-सुलट क्रमाने लिहून घेतले. प्रत्येक विद्यार्थ्याला प्रथम शब्दकोडे मधील अक्षरे वाचून घेऊन त्याचा सराव घेतला. म्हणजे प्रत्येक अक्षर विद्यार्थ्यांना अचूकपणे वाचता येतील. नंतर त्या शब्दकोडेमधील अक्षरांचा वापर करून दोन अक्षरी,तीन अक्षरी, अर्थपूर्ण शब्द तयार कसे करायचे हे समजून सांगितले. त्यानंतर फळ्याजवळ प्रत्येकाला वैयक्तिकरित्या बोलावून शब्द तयार करण्यास प्रोत्साहन दिले. तयार झालेला अर्थपूर्ण शब्दाचे प्रकट वाचन करण्यास सांगितले .या शब्दापासून आवडीचे वाक्य तयार करण्यास सांगितले. उदा आंबा

वाक्य - आंबा हा फळांचा राजा आहे.

### उपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही :

प्रथम फळ्यावर शब्दकोडेआखून घेतले.

Iळ I गा. I वा. I ज. I
I___I__I_I__.I
Iन. Iडी. I र. Iघ. I
I___I__I__ I. I
Iहि. I म. I य. I ऊ.I
I__I__I_I__ I

आता मुलांना दिलेल्या शब्दकोड्यांपासून तयार होणारे दोन अक्षरी, तीन अक्षरी, अर्थपूर्ण शब्द बनवायला सांगितले. तेव्हा विद्यार्थी स्वतः वा एकमेकांच्या सहकार्यातून, चर्चेतून, चिकित्सक विचार करून, निरीक्षण करून शब्द बनवण्यास गुंतून गेले. वैयक्तिकरित्या त्यांना फळ्याजवळ बोलवून शब्द बनविण्यास लावला आणि त्या शब्दावर एखादे वाक्य करण्यास सांगितले. मुले स्वखुशीने फळ्याजवळ येऊन शब्द बनवू लागले. व त्यांचा शब्दसाठा वाढू लागला.

बनवलेले शब्द

| | | |
|---|---|---|
| हिवाळा | गाडी | वार |
| गाजर | घर | वाडी |
| वानर. | मळा. | नऊ |
| वाघ | गाय | गार |

या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढला. शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया होऊन शब्दसाठा वाढण्यास मदत झाली.

**अध्ययन निष्पत्ती :** १) या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल आवड अभिरुची निर्माण झाली. २) विद्यार्थी आवडीने शब्दकोडे सोडवू लागले. ३) मराठी भाषेतील क्षमता व कौशल्य विकसित झाली. ४) निरीक्षण क्षमता विकसित होण्यास मदत झाली. ५) निर्णय क्षमता विकसित झाली. ६) कृतीमध्ये सहभाग नोंदवल्यामुळे आत्मविश्वास वाढला. ७) स्वतःचे अनुभव विचार स्पष्ट व समर्पक शब्दात व्यक्त करण्यास शिकलेत. ८) शब्दांचा वाक्यात उपयोग करतात व निर्मितीचा आनंदही मिळायला लागलेत.

**जयश्री उद्धवराव मुसळे**
**जि प प्राथमीक शाळा परधाडे**
**ता. पाचोरा जि. जळगाव**

***

तन्मयता नसेल तर; विद्वत्ता व्यर्थ आहे.

जीवनातील प्रत्येक क्षणी शिकणं म्हणजे शिक्षण.

स्पर्श न करता विद्यार्थ्याला शिक्षा करता येते तोच खरा शिक्षक!



# उपक्रम क्र. १९

## वाचाल तर वाचाल...

**इयत्ता :** पहिली ते चौथी साठी उपयुक्त

**विषय :** भाषा व कार्यानुभव

### अध्ययन निष्पत्ती :

१) लिखित /छापील मजकुरातील अक्षर, शब्द, वाक्य संबोध ओळखणे २)न अडखळता वाचणे ३) अवांतर वाचन करणे ४) टाकाऊतून टिकाऊ असे वाचन साहित्य तयार करता येणे.

### उपक्रमा साठी लागणारे साहित्य :

अक्षरकाड्र्स, शब्दकाड्र्स, वाक्यकाड्र्स, साड्यांचे खोके, जुन्या लग्नपत्रिका, जुने कॅलेंडर वर्तमानपत्र, जुन्या पुस्तकातील चित्रे, स्केच पेन

### उपक्रमाच्या कृतीचे पूर्वनियोजन :

१) प्रथम विद्यार्थ्यांशी तुम्हाला वाचण्यासाठी काय मजकूर आवडेल याविषयी चर्चा केली. मग त्यांना वाचनाचे महत्व सांगून "वाचाल तर वाचाल"याचा अर्थ समजून सांगितला. वयोगटानुसार त्यांनी अक्षर, चित्र, शब्द, वाक्य, उतारे असे सांगितले. मग त्यांना सांगितले की आपल्याला हे साहित्य टाकाऊतून टिकाऊ अस तयार करायचा आहे. तुमच्याकडे जे टाकाऊ साहित्य असेल ते शोधा, वाचा व जमा करा. त्यांना टाकाऊ वस्तु कोणत्या, याविषयी माहिती दिली. तोपर्यंत मी पाठ्यपुस्तकातून, वर्तमानपत्र पुस्तके यातून आवश्यक मजकूर जमा केला. दोन दिवसात साड्यांचे खोके चहा, साबण यांचे खोके, लग्नपत्रिका, कॅलेंडर, रंगीत कागद असं बरंच साहित्य जमले. २) आता याच काय बनवणार याची उत्सुकता मुलांना वाटली. याच्या जोडीला मी कार्डशीट, स्केचपेन, रंगपेटी, मार्कर, लॅमिनेशन पेपर, फोल्डर इ. साहित्य घेतले.

### कालावधी :

वाचन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे व तयार होणारे साहित्य सर्व वर्गसाठी उपयुक्त असल्याने विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार वाचन करतात.

### उपक्रमांची कार्यवाही :

प्रथम साड्यांचे खोके घेऊन ते कापून त्याचे मधला भाग व बाजूच्या पट्टी असे वर्गीकरण केले. पत्रिकांमधीलही कोरे लिहीण्यायोग्य लहान-मोठे कागद वेगळे केले. कॅलेंडरच्या पानांवर विद्यार्थ्यांच्या मदतीने पांढरा कागद चिटकवून बॉर्डर करून घेतले. मग मुलांच्या सांगण्याप्रमाणे त्या



कागदांवर अक्षर, शब्द, वाक्य, जोडाक्षर उमटवत गेली. पत्रिका वरील मजकूर म्हणजे पाहायला छान वाचायलाही छान. टाकाऊ कागदांना टिकाऊ स्वरूप प्राप्त झाले होते. आपण आणलेले साहित्य वापरत आहेत हे पाहून मुलं खुश होत होती. काही मुलांनी तर पत्ते आणले होते. मग काय मुलांच्या मदतीने त्यावर पांढरा कागद चिटकवले व त्या कार्डावर मग चित्र, अल्फाबेट, समानार्थी, विरुद्धार्थी, जोड्या लावा असा मजकूर लिहिला. विद्यार्थ्यांना वैयक्तिक, जोडीने व गटागटाने हसत-खेळत शिकण्यासाठी अतिशय कमी खर्चात टिकाऊ असे वाचन साहित्य तयार झाले. आधी वरच्या वर्गातील मुलांना सर्व वाचन साहित्य कसे हाताळायचे याबद्दल माहिती दिली. त्यांचे निरीक्षण अनुकरण करत मग इतर मुलंही वर्गात, ओटयावर, झाडाखाली वाचन करायला लागली. या साहित्य वाचनातून वाचनाची गोडी लागल्यावर मग त्यांना गोष्टींची पुस्तकं दाखवण्यात आली.

## उपक्रमाचे अध्ययन निष्पत्ती :

१) विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली. २) निरीक्षण, अनुकरण करण्याची सवय लागली. ३) वाचन करताना मुले एकमेकात मिसळू, लागली. चर्चा करून, एखाद्याला काही समजले नाही तर बाकीचे त्याला समजावून सांगू लागली. यातून जबाबदारीची, समजून घेण्याची वृत्ती वाढीस लागली. ४) शब्दसंपत्ती वाढली. ५) अवांतर वाचन करण्याची आवड निर्माण झाली. ६) साहित्य तयार करण्यात प्रत्यक्ष सहभाग असल्याने विद्यार्थी




साहित्य काळजीपूर्वक हाताळतात. स्वतः बनवण्याचा आनंद वेगळाच असतो, त्यातून श्रमाबद्दल आदर निर्माण होतो. ७) नीटनेटकेपणा, सहकार्य, समानता, ही मूल्ये रुजवली गेली.
८) कोणतीही वस्तू ,कागद फेकणे आधी तो वाचणे, ती वस्तू आपल्याला कशी, कुठे कामात येईल याचा विचार करून कलात्मक व संग्रह वृत्ती जोपासली जाते.

**मोहिनी बाबुराव पाटील**
**जि. प. प्राथमिक विद्यामंदिर नांद्रा**
**ता. पाचोरा जि. जळगाव**

***

# उपक्रम क्र. 20

## लोकरी पासून राखी बनवणे.



**इयत्ता :** तिसरी

**विषय :** कार्यानुभव

**अध्ययन निष्पत्ती :**

१) लोकरीची ओळख करून घेतात. २) लोकर पासून सुंदर आकर्षक राख्या बनवितात. ३) मणी मोती टिकल्या या पासून सौंदर्य कृती राखीवर करतात. ४) रक्षाबंधन साठी स्वतः तयार केलेली राखी भावाला बांधतात.

**उपक्रमासाठी लागणारे साहित्य :** लोकर, कात्री, पट्टी, कंगवा, मोती मणी, टिकल्या, कागद इ.



**उपक्रमाची पूर्वतयारी :**

मी सुरवातीला राखी बनवता येते का, कोणी शिकवली आहे का, या अगोदर कशापासुन राखी बनविली होती. कोणकोणत्या साहित्यांचा वापर केला होता असे प्रश्न पूर्वज्ञानावर आधारित विचारले.

**उपक्रमाचा कालावधी :** तीन तास

**उपक्रमाची कृती :**

१) सर्वप्रथम विद्यार्थ्यांना साहित्याची ओळख करून दिली. २) लोकरीचे विविध सुंदर रंग असतात हे दाखविले. ३) लोकरीचा एक रंग घेऊन त्याचा दोरा पट्टीवर तीस-पस्तीस वेळा वेढा देऊन गुंडाळला. ४) गुंडाळून झाल्यावर ते पट्टीतून बाहेर काढले व मधोमध लोकरीने दोन-तीन पक्की गाठ मारली. ५) त्यानंतर त्याच्या आजूबाजूचे बंदिस्त तोंड कात्रीने सुटे केले. सुटे झालेल्या मध्यभागी म्हणजे गाठ मारल्याचे ठिकाणी वरून अंगठा व



खालून तर्जनीने घट्ट पकडून आजूबाजूच्या सुट्ट्या भागावर कंगवा फिरवला. ६) कापसासारखा जोपर्यंत मऊ होत नाही तोपर्यंत सर्व बाजूने हळूहळू कंगवा फिरवला. ७) सर्व बाजूने फिरवून झाल्यावर आजूबाजूचा भाग व्यवस्थित वर्तुळाकृती पद्धतीने

कात्रीने कापून घेतला. जेणेकरून त्याचा आकार छान दिसेल. ८) नंतर तयार झालेल्या वर्तुळाकृतीच्या खालच्या बाजूस लांब दुहेरी लोकर साधारणतः सात-आठ इंच लांब कापून मागच्या बाजूस मध्यभागी फेविकॉलने चिटकविली. ९) जेणेकरून ती लोकर दोन्ही बाजूस समान सुटलेली होती. त्यानंतर त्यावर लहान चौकोनी कागदाचा तुकडा चिटकवला. १०) वाळल्यानंतर तो भाग सरळ करून पुढच्या भागावर मोती, मणी, टिकल्या आपल्या कल्पनेने सौंदर्य कृती केली. ११) ते आकर्षक व सुंदर दिसेल अशाप्रकारे लोकर पासून आपल्या जवळ उपलब्ध साधनांनी सुंदर राखी बनविता आली.

### उपक्रमाची वैशिष्ट्ये :

१) स्व निर्मितीतून आनंद मिळाला. २) सर्जनशीलतेला वाव मिळाला. ३) कमी खर्चात आकर्षक राख्या बनविता आल्या. ४) पर्यावरण पूरक साहित्य निर्मिती करता आली. ५) भविष्यात या कौशल्याचा वापर करून कुटुंबास अर्थार्जनही होऊ शकते.

### उपक्रमातून झालेली फलनिष्पत्ती :

१) या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्व निर्मितीचा आनंद मिळाला. २) तसेच आपल्या स्व कल्पकतेने विविध सुंदर आकर्षक राख्या बनवल्या. ३) मुलींनी आपल्या हाताने बनविलेल्या राखी आपल्या भावांना बांधल्या. ४) पैशाची बचत कशी करावी हे समजले. ५) तसेच या उपक्रमात मुलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला व त्यांनीही राख्या बनवल्या.

**गायत्री रमेशचंद् जैन.**
**जि. प. प्रा. बांबरूड राणीचे**
**ता. पाचोरा जि. जळगाव**

***

स्वतःची चूक स्वतःला कळली की बरेच अनर्थ टळतात.

या हृदयीचे त्या हृदयी देता येते तोच खरा शिक्षक.

माणसाची चौथी मूलभूत गरज म्हणजे पुस्तक.



# उपक्रम क्र. २१

## Learn to speak English

**इयत्ता :** तिसरी चौथी

**विषय :** इंग्रजी

**उपक्रमातील अध्ययन निष्पत्ती :**

1) Listen to English words greetings polite form of expression and respond in English 2) speaks about herself or himself in simple English 3) Take part in small conversation role play etc. 4) read small words sentence paragraphs confidently.

**साहित्य :**

दोनशे पानी, वही, चित्रकार्ड, शब्दकार्ड cardsheet for various expression greetings etc.

**उपक्रमाची गरज :**

जून 2018 मध्ये ऑनलाईन बदली ने जिल्हा परिषद शाळा बांबरुड येथे हजर झाली. माझ्याकडे तिसरी सेमीचा वर्ग आला. मुलांचा आढावा घेतल्यानंतर त्यांची गुणवत्ता पाहून खूप आनंद झाला. सर्वच विद्यार्थी हुशार, उत्साही चुणचुणीत आणि काहीतरी नवीन शिकण्याची इच्छा असणारे होते. त्यामुळे आपणही शिक्षिका या नात्याने नवीन काहीतरी करावे या हेतूने learn English speak English activity करण्याचे ठरवले .

**उपक्रमाची कार्यवाही :**

१) सर्वप्रथम प्रत्येक विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाचे पूर्वज्ञान, त्याला प्राप्त क्षमतांचा आढावा घेतला. २) त्यानंतर प्रत्येकाचे त्यांच्या क्षमतेनुसार गट केले.

३) विद्यार्थ्यांना उपक्रमासाठी स्वतंत्र वही करण्यास सांगितली. ४) प्रथम दैनंदिन जीवनात बोलताना वापरल्या जाणाऱ्या छोट्या छोट्या शब्दांपासून सुरुवात केली. Hi, Hello, come, go, take, give, where, there etc.

५) विद्यार्थ्यांना दररोज दिल्या जाणाऱ्या शब्दांचे उच्चार व अर्थ लिहून देऊन त्यांचे जास्तीत जास्त वैयक्तिक तसेच सामूहिक वाचन करून घेतले.



६) आजच्या शब्दांचा वाक्यांचा सराव लगेच दुसऱ्या दिवशी न चुकता घेतला. ७) विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लक्षात घेऊन शब्द, वाक्य, छोटे संभाषण, छोटे उतारे या पद्धतीने क्रम वाढवत नेला. ८) हळूहळू विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची गोडी निर्माण होऊ लागली. ९) ते आपसात बोलताना जास्तीत जास्त इंग्रजी शब्द वाक्य वापरू लागले. प्रत्येकाची क्षमता भिन्न असल्याने त्यांच्या क्षमतेनुसार सराव घेणे सुरू केले. १०) मी स्वतः वर्गात अध्यापन करताना जास्तीत जास्त इंग्रजी बोलणे सुरू केले. ११) जवळ-जवळ सर्व सूचना सोप्या पद्धतीने परंतु इंग्रजीत देणे सुरू केले. १२) अधून-मधून प्रोजेक्टर, मोबाईल वरील व्हिडीओ दाखविणे हा उपक्रम घेतला. १३) स्पीकिंग म्हणजेच भाषण ही क्षमता आत्मसात करण्यासाठी लिसनिंग म्हणजे श्रवणाची जोड असावी लागते म्हणून प्रकट वाचनावर भर दिला. १४) स्वतःची माहिती इंग्रजी मध्ये लिहिणे, परिपाठात तोंडी सादर करणे यासारख्या कृती विद्यार्थी स्वतःहून करू लागले. छोटे छोटे उतारे वैयक्तिक वाचू लागले. वाचन घेणे, पाठ्यपुस्तकातील गोष्टींचे वाचन करणे, या कृतींचा समावेश केला.

### कालावधी :

रीडिंग अँड रायटिंग म्हणजेच श्रवण, भाषण-संभाषण वाचन, लेखन क्षमता आत्मसात करत सतत चालणारी प्रक्रिया आहे त्यामुळे हा दीर्घकाळ चालणारा उपक्रम आहे.

### उपक्रमाची वैशिष्ट्ये :

१) सर्वात महत्त्वाचे म्हणजे इंग्रजी माध्यमाचा शाळेत शिक्षण घेतल्यानेच इंग्रजी बोलता येते विद्यार्थ्यांमधील हा गैरसमज किंवा न्यूनगंड दूर झाला. २) श्रवण, भाषण, वाचन, लेखन सर्व क्षमतांचा विकास होण्यास मदत झाली. ३) इंग्रजी विषयाची भीती दूर झाली.

### फलनिष्पत्ती :

उपक्रमामुळे माझ्या वर्गात खालील बदल झालेत.

१) मुळातच हुशार असलेली माझी मुले गणित व भाषा विषयासोबतच इंग्रजी विषयाचाही आवडीने अभ्यास करू लागली. इंग्रजी विषयाबद्दल भीती दूर झाली. ३) मी पण इंग्रजी वाचू शकतो बोलू शकतो, हा आत्मविश्वास निर्माण झाला. ४) इतरांपेक्षा आपण काहीतरी नवीन वेगळे करतोय याचा आनंद निर्माण झाला.

**रुपाली बाबुराव चौधरी.**

**जि. प. मराठी शाळा बांबरुड राणीचे**

**तालुका पाचोरा जिल्हा जळगाव**

***

हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.



# उपक्रम क्र. 22
## वाचन कौशल्य विकसित करणे

**इयत्ता :** दुसरी

**विषय :** भाषा

पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्रमांक 02.01.07 (आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार, कथा-कविता, चित्र, पोस्टर इत्यादीचे आनंदाने वाचन करणे).

### उपक्रमाची गरज व उद्दिष्टे :

श्रवण, भाषण, वाचन, लेखन ही महत्त्वाची भाषिक कौशल्ये आहेत. यात वाचन कौशले हे भाषा साध्य करण्याचे तसेच संवाद व कल्पना व्यक्त करण्याचे साधन आहे. वाचनामुळे बुद्धीची मशागत होते. सतत वाचनामुळे विद्यार्थ्यांना नव्याने विचार सुचतात. त्यामुळे बुद्धीवर सर्वोत्तम संस्कार होतात. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकास होतो. वर्तमान काळातील, व भूतकाळातील घटनांचा मागोवा आपल्याला वाचनामुळे घेता येतो. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या अंतर्बाह्य व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आमची शाळा चौथीपर्यंत आहे. ज्या विद्यार्थ्यांचे पालक जागृत आहेत, ते त्यांच्या पाल्यांच्या अभ्यास घेतात. त्यामुळे विद्यार्थी वाचनात पुढे आहेत. पण बहुतेक विद्यार्थ्यांचे पालक अशिक्षित आहेत. ते आपल्या पाल्यांना वेळ देऊ शकत नाही. वाचता न येणारे विद्यार्थी वर्गात बोलताना, वावरताना घाबरतात. त्यांच्यात आत्मविश्वासाचा अभाव असतो. तेव्हा त्यांना जास्तीत जास्त मोकळेपणाने बोलते करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन निष्पत्ती वर आधारित वाचन कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. वर्गाची गुणवत्ता ही जास्तीत जास्त वाचन कौशल्यावर आधारित आहे. म्हणूनच हा उपक्रम राबवणे गरजेचे आहे.

### उद्दिष्टे :

1) वाचनाने ज्ञान प्राप्ती होणे. 2) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे. 3) चित्रे, कथा, गोष्टी, पोस्टर इत्यादीचे आनंदाने वाचन करणे. 4) वाचनातून विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार करणे. 5) विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे. 6) 'वाचणार वाचणार 100% वाचणार' हे उद्दिष्ट साध्य करणे. 7) शाळा व अभ्यासाविषयी अभिरुची निर्माण करणे.

### उपक्रम कृतीचे पूर्वनियोजन :

**1) उपक्रम पूर्वस्थिती नियोजन :** आमची शाळा पहिली ते चौथीपर्यंत आहे. सर्वप्रथम आम्ही सर्व शिक्षकांनी मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली एक मीटिंग घेतली व त्यात वाचन न येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रम घेण्याचे ठरवले. प्रत्येक वर्गशिक्षकांनी आपल्या वर्गाच्या अध्ययन निष्पत्ती नुसार वाचण्यासाठी कोणते उपक्रम राबवावे याविषयी सविस्तर चर्चा केली.

**2) संबंधित व्यक्ती, तज्ञांशी चर्चा :** आमच्या केंद्राचे केंद्रप्रमुख यांना आम्ही आमच्या उपक्रमाविषयी कल्पना दिली. त्यांनीही काही मार्गदर्शक बाबी सांगून आम्हाला उपक्रम राबविणे बाबत सहकार्य केले. व त्यानुसार नियोजन केले. वाचन येणारे व न येणारी या विद्यार्थ्यांची यादी केली.

**3) आवश्यक साधनांचा विचार :** या उपक्रमासाठी लागणारे साहित्य, पुस्तके, मासिके, चित्रे, पोस्टर, कथा-कविता संग्रह आदींचे संकलन केले. अक्षर - शब्द- वाक्य - चित्र पट्ट्या तयार करून घेतल्या. थर्माकोल, कार्डशीट पेपर आदी वस्तूंचे संकलन करून प्रत्यक्ष उपक्रम कार्यवाहीस सुरुवात केली.

## साहित्य :

1) शाळेतील नवी - जुनी पुस्तके, वृत्तपत्रे, किशोर मासिक. 2) शाळेतील सर्व शिक्षकांचे अँड्रॉइड मोबाइल. 3) प्रोजेक्टर. 4) कॉम्प्युटर. 5) अक्षर कार्ड, शब्द कार्ड, वाक्य कार्ड. 6) वाचन कोपरा.

## कालावधी :

हा उपक्रम राबवण्यासाठी ऑगस्ट ते फेब्रुवारी हा कालावधी निश्चित केला. कारण वाचन ही प्रक्रिया सतत चालणारी आहे. वर्षातून फक्त दोन महिने वाचन केले म्हणजे झाले असे नाही. तेव्हा ही प्रक्रिया निरंतर चालणारी आहे. तेव्हा यासाठी जास्त कालावधी देणे आवश्यक आहे.

## कार्यवाही :

प्रत्येक विद्यार्थ्याला जवळ बोलावून त्याचे वाचन कौशल्य कुठल्या स्तरापर्यंत आहे हे निश्चित केले व त्यानुसार वाचनाचा कृती कार्यक्रम आराखडा तयार केला. त्याप्रमाणे रोज एक तास विद्यार्थ्यांचे वाचन सराव घेतला.

1) चित्रवाचन : सात- सात विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला चित्र कार्ड देऊन चित्र वाचन करण्यास सांगितले. चित्रातील वस्तू, चित्रे, पशुपक्षी, झाडं, फुलं, व्यक्ती या विषयी विद्यार्थी मनमोकळेपणाने बोलू लागले. 2) अक्षर वाचन : रोज अक्षर कार्ड चे वाचन घेणे. एक अक्षर घेऊन त्या अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांचे विद्यार्थ्यांकडून वाचन घेणे.





3) अक्षर वाढदिवस : जे, अक्षर शिकवले ते अक्षर केकच्या प्रतिकृती ठेवून विद्यार्थ्यांकडून अक्षराचा वाढदिवस साजरा केला. त्यामुळे विद्यार्थ्यांना अक्षर ओळख चांगली झाली आणि ते अक्षर विद्यार्थ्यांच्या पक्के लक्षात राहिले.

4) शब्द वाचन: दोन अक्षरे विद्यार्थ्यांकडून जोडून शब्द तयार करून घेतले. विद्यार्थ्यांकडून दोन अक्षरी, तीन अक्षरी व चार अक्षरी शब्द तयार करून शब्द वाचन करून घेतले. शब्द – क + प = कप

म + ग + र = मगर

5) वाचन झाड : शाळेच्या मैदानावरील एका झाडाला अनेक शब्द कार्ड बांधण्यात आली मधल्या सुट्टीत विद्यार्थी झाडाखाली बसून त्या शब्द कार्डांचे वाचन करू लागले. असे वाचन करताना मुलांना खूपच आनंद झाला.

6) वाचन कोपरा : वर्गातील एका कोपऱ्यात अक्षरकार्ड, शब्दकार्ड, चित्र, तरंग चित्रे चिकटवून वाचन कोपरा तयार केला. रोज त्या कोपऱ्यातील प्रत्येक कार्ड चे वाचन प्रत्येक विद्यार्थ्यांकडून करून घेतले.

7) चित्रे : शब्द – चित्रे व शब्द यांच्या जोड्या लावणे. एका ट्रेमध्ये चित्रे व चित्रांची नावे ठेवली मोराचे चित्र कार्ड व मोर असे नाव कार्ड एकत्र करून ठेवली. एकेक विद्यार्थ्यांनी चित्र आणि चित्रांची नावे शोधून त्यांच्या जोड्या लावल्या.

8) शब्द डोंगर : विद्यार्थ्यांना एक शब्द देऊन त्याला जोडून दुसरा शब्द सुचवण्यास सांगितले. नंतर तिसरा, चौथा असे एकेक शब्द सुचवून त्यांचा शब्द डोंगर बनवून घेतला.

उदा . 1) घर :

घर

माझे घर.

माझे सुंदर घर.

माझे खूप सुंदर घर.

माझे घर खूप सुंदर आहे.

माझे घर मला खूप खूप आवडते.

माझे घर खूप खूप सुंदर व मोठे आहे.

माझ्या घराजवळ खूप सुंदर जागा आहे तेथे आम्ही खेळतो.

माझ्या घराजवळ एक मोठी सुंदर शाळा आहे तेथे आम्ही शिकतो

2) वाचतो: गौरव वाचतो.

गौरव मराठी वाचतो.

गौरव मराठी उतारा वाचतो.

गौरव मराठी उतारा व कविता ही वाचतो.

गौरव रोज मराठी उतारा व कविताही भराभर वाचतो.

गौरव रोज गौरी सोबत मराठी उतारा व कविता भराभर वाचतो.

गौरव रोज गौरी व इतर मित्रांसोबत मराठी उतारा व कविताही भराभर वाचतो.

3) कुत्रा : माझा कुत्रा.

हा माझा कुत्रा.

हा माझा रॉकी कुत्रा.

हा माझा रॉकी कुत्रा, कुत्र्याचे शेपूट वाकडे आहे.

हा माझा लाल रंगाचा रॉकी कुत्रा, कुत्र्याचे शेपूट वाकडे आहे. हा माझा लाल रंगाचा रॉकी कुत्रा, कुत्र्याचे शेपूट वाकडे आहे तरी तो प्रामाणिक आहे.

हा माझा लाल रंगाचा रॉकी कुत्रा कुत्र्याचे शेपूट

वाकडे आहे तरी तो प्रामाणिकपणे आमच्या घराची व शेताची राखण करतो.

9) वृत्तपत्रे, किशोर मासिक : वृत्तपत्रातील सुविचारचे रोज परिपाठात वाचन करणे. किशोर मासिकातील कविता गोष्टींचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेणे. जाहिरात वाचन करणे. 10) चित्रकथा : वेगवेगळे चित्र क्रमाने जोडून चित्रकथा तयार करणे. 'लोभी कुत्रा' ही चित्रकथा चित्र क्रमाने जोडून गोष्ट पूर्ण करणे. 11) वाक्य वाचन : दोन तीन शब्द जोडून वाक्य तयार करणे. त्याचे वाचन करणे. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वाक्य बनवण्याचा व वाक्य वाचनाचा सराव दिला. रोज वरील प्रमाणे वाचनाच्या प्रत्येक पायरी नुसार व स्तरानुसार विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वाचनाचा सराव देण्यात आला.

फलनिष्पत्ती : सुरुवातीला या उपक्रमात फक्त वाचन येणारी मुलं सहभागी व्हायची. वाचन न येणारी मुले घाबरायची. एखाद्या विद्यार्थ्याला वाचन करण्यास सांगितले की तो खाली मान घालून बसायचा. मला वाचता येत नाही असे सरळ सांगून मोकळा व्हायचा. पण रोज नवीन नवीन, वाचनाच्या सरावामुळे सर्व विद्यार्थी सहभागी होऊ लागले. आनंदाने वाचन करू लागले पूर्वीपेक्षा विद्यार्थ्यांच्या वाचनात प्रगती झाली, सुधारणा झाली. वाचन येणारे व वाचन न येणारे विद्यार्थी यांच्यातील दरी नाहीशी झाली. विद्यार्थी अवांतर वाचन करू लागले. वृत्तपत्रातील कथा सुविचार परिपाठात वाचू लागली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. वाचनाची व अभ्यासाची आवड निर्माण झाली.

विजया भालचंद्र पाटील
जि. प. केंद्रीय पूर्ण प्राथमिक शाळा
बाळद बु. ता. पाचोरा जि. जळगाव

***

विचारवंत होण्यापेक्षा आचारवंत व्हा.

वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन.

टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही.

2020

# उपक्रमशील शिक्षिका












## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव.

गट नं 183-2/184,अजिंठा मार्ग चिंचोली शिवार, चिंचोली ता.जि- जळगाव